अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार दि. २२ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ८६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# गुडघ्याला बाशिंग बांधून बसलोय आम्ही लग्नाळू; जिल्हाधिकारीसाहेब; व्हा कनवाळू, आता नका टाळू

✔ सुराज्य/सोलापूर

**स्थळ होम ... मैदान. दुपारचे बारा वाजलेले.... ना मांडव; ना नवरी .... तरी देखील नवरदेव बोलल्यावर चढण्यासाठी तयार ... अंगात चुडीदार ... डोक्यावर जिरेटोप ... भाळी मुंडवळ्या ...इकडे वाजंत्र्यांची लगबग.... वरातीसाठी घोडेदेखील सज्ज... असा हा साग्रसंगीत लवाजमा. पाहणाऱ्याला वाटले ही सामुदायिक विवाह सोहळ्याची वरात. मात्र हा होता मोर्चा. तोसुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला. गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या, नवरी मिळत नसल्यामुळे स्त्री भ्रूणहत्या कायद्याची कडक अंमलबजावणी करावी या मागणीसाठी लग्नाळू नवरदेवांनी वरातीच्या तयारीनेच जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मारली. 'जिल्हाधिकारीसाहेब आमच्यासाठी व्हा कनवाळू अन् स्त्रीभ्रूणहत्या विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीला नका टाळू' अशी विनंती 'आम्ही लग्नाळू' म्हणणाऱ्या नवरदेवांनी जिल्हाधिकाऱ्यांना मागणीद्वारे केली.**




देशात मुलींचा जन्मदर दरहजारी मुलांमागे ९४० आहे. पुरोगामी महाराष्ट्रात तर मुलींचा जन्मदर हजार मुलांमागे केवळ ८८९ आहे. शहरी व ग्रामीण भागात लग्नासाठी मुली मिळत नसल्यामुळे चाळिशीकडे झुकत असतानाही तरुणांची लग्ने होत नाहीत. तरुणांच्या आई-वडिलांसाठी हा गंभीर प्रश्न बनत आहेत. वय वाढत असूनही लग्न जुळत नसल्यामुळे तरुणांमध्ये नैराश्य आणि व्यसनाधीनता वाढत आहे. त्यामुळे गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग तंत्रनिदान प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी या मागणीसाठी हा मोर्चा काढला.

**- रमेश बारसकर (क्रांती संघटना अध्यक्ष)**

माझे शिक्षण पूर्ण झाले आहे. शेती करतो,शेती बागायत आहे. मात्र मुलीच्या अपेक्षा वाढल्या आहेत. वय वाढत चालले आहे. विवाहासाठी आईवडिलांनी हात टेकले आहेत. मुलींना शहरात बंगला असलेला गलेलठ्ठ पगारवाला मुलगा पाहिजे. शेतकरी मुलांशी लग्न करण्यास मुली तयार नाहीत. मुलींचे प्रमाण वाढवण्याची मागणी करण्यासाठी मागणी या मोर्चाच्या माध्यमातून केली आहे.

**- मोर्चातील एक लग्नाळू तरुण नवरदेव**

समाजात मुलांच्या तुलनेत मुलींचा जन्मदर झपाट्याने घटत चालला आहे. गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग तंत्रनिदान प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे मुलींना आईच्या गर्भातच मारून टाकण्याचे प्रकार उत्तरोत्तर वाढत आहेत. त्यामुळे लग्नासाठी मुलींचे स्थळ मिळणे कठीण होत आहे. या सामाजिक प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सोलापुरात लग्नाळू तरुणांनी नवरी मिळण्यासाठी नवरदेव बनून जिल्हाधिकारी कार्यालयावर महाराष्ट्र राज्य ज्योती क्रांती संघटनेकडून बुधवारी हा अनोखा मोर्चा काढण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष रमेश बारसकर यांनी या अनोख्या मोर्चाचे नेतृत्व केले. नवरदेवाचा पोशाख परिधान करून, डोक्याला मुंडावळ्या आणि फेटा बांधून, हातात कट्यार घेऊन आणि घोड्यावर विराजमान होऊन वाजंत्रीसह निघालेल्या या मोर्चात २५ पेक्षा जास्त घोड्यांवर आणि त्याहून अधिक लग्नाळू तरुण नवरदेव होऊन पायी चालत होते. लग्नाळू तरुणांच्या हातात 'कोणी मुलगी देता का मुलगी लग्नासाठी, मुलींचा जन्मदर वाढवा, गर्भलिंग तंत्रनिदान चाचणी प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा, सोनोग्राफी यंत्राचा दुरुपयोग करून मुलींना जन्माआधीच मारून टाकणाऱ्या डॉक्टरांचा बंदोबस्त करा' असे फलक होते. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.

## सलगर येथे पत्नीचा खून करण्याचा प्रयत्न, पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

▶ कर्नाटक पोलिसात दाखल झाली तक्रार

✔ सुराज्य/सोलापूर

कौटुंबिक वादातून माहेरी गेलेली विवाहिता दागिने आणि कपडे घेण्यासाठी आपल्या बहिणीसह सासरी आली होती. त्यावेळी पतीसह तिघांनी तिला लोखंडी रॉड आणि दगडाने मारहाण करून खून करण्याचा प्रयत्न केला.

ही घटना सलगर (ता. अक्कलकोट) येथे २३ऑगस्टच्या पहाटे घडली होती. त्यानंतर जखमी विवाहिता कर्नाटकात जाऊन तक्रार दाखल केली. तेथील पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो गुन्हा अक्कलकोट (उत्तर पोलीस) ठाण्यात तपास कामासाठी वर्ग केला आहे.

शिल्पा बसवराज पाटील (वय २७ सध्या रा.बेंगलोर) या विवाहितेने फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तिचा पती बसवराज चनबसप्पा पाटील, श्रीशैल पाटील(दीर)आणि सासू धानम्मा पाटील (सर्व रा.सलगर ता.अक्कलकोट) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कौटुंबिक वादातून शिल्पा पाटील ही कर्नाटक येथे माहेरी राहण्यात गेली होती. दिवाळी सणासाठी दागिने आणि कपडे घेण्यासाठी ती २३ ऑगस्ट रोजी आपल्या बहिणी सोबत सलगर येथे आली होती. त्यावेळी तिघांनी त्यांना मारहाण केली होती.

त्यानंतर ती कलबुर्गी(कर्नाटक) येथील ब्रह्मपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे तेथील पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो अक्कलकोट पोलिसाकडे वर्ग केला आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक भावीकट्टी करीत आहेत.

## अभिमानश्री नगरात तरुणाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : शहरातील अभिमानश्री नगरात राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. ओम संजय मोरे (वय १८ रा. अभिमानश्री नगर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. पुढील तपास हवालदार घुगे करीत आहेत.

## ब्रम्हपुरी येथे पिकअप वाहनाच्या धडकेत तिघे ठार

✔ **सोलापूर** : मोटर सायकलस्वारास पाठीमागून पिक अप वाहनाने ठोकरल्याने तीघांचा मृत्यू तर एकजण जखमी झाल्याची घटना ब्रम्हपुरी येथे घडली. या प्रकरणी चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवून तीघांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी श्रीशैल्य प्रशांत देशमुखे(रा.ब्रम्हपुरी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की,यातील फिर्यादी मल्हारी तायाप्पा पाराध्ये(रा.ब्रम्हपुरी) यांचे सासरे मयत सोपान तायाप्पा भालेराव (वय ५०),सासू जयश्री सोपान भालेराव(वय ४५ दोघे रा.परमेश्वर पिंपरी),नात प्रज्वला उर्फ वाघ्या प्रशांत भालेराव (वय ५ वर्षे),मावस सासू कस्तूरा तुकाराम साठे(वय ४० रा.हिरज) आदीजण पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील यल्लामा देवीच्या यात्रेस जावून परत गावाकडे जात असताना दि.२० रोजी ६.४५ वाजण्याच्या दरम्यान मंगळवेढा-सोलापूर रोडवरील ब्रम्हपुरी येथील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ एम एच १३, सी.जे.०६६२ या पिक अपने एम एच १३, डी.एल.९६७५ या मोटर सायकलला पाठीमागून वेगाने येवून धडक दिल्याने सोपान भालेराव, जयश्री भालेराव, कस्तुरा साठे हे तीघेजण जखमी होवून मयत झाले तर पाच वर्षीय प्रज्वला ही गंभीर जखमी झाली. अपघातानंतर आरोपी तथा चालक श्रीशैल्य देशमुखे हा वाहनासह स्वतः मंगळवेढा पोलिस स्टेशनमध्ये हजर झाल्याचे सांगण्यात आले.तपासिक अंमलदार तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक अमोल बामणे यांनी त्यास अटक करून न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने जामीन मंजूर केला.

## भारत-बांगलादेश यांच्यात आज दुसरा कसोटी सामना

✔ **सोलापूर** : भारत आणि बांगलादेश यांच्यात गुरुवारी दुसरा आणि शेवटचा कसोटी सामना खेळला जाणार आहे. पहिल्या कसोटी सामन्यात भारतानं यजमान संघाचा १८८ धावांनी पराभव केला. भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसरा कसोटी सामना ढाका येथे खेळवला जाणार आहे, ज्यामध्ये पाहुणा संघ पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेल. रोहित शर्मा अजूनही दुखापतीतून सावरला नसल्यानं दुसऱ्या कसोटी सामन्यातही केएल राहुल भारतीय संघाचं नेतृत्व करेल. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत १-० नं आघाडीवर आहे. भारतानं पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात ४०४ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा पहिला डाव १५० धावांवर आटोपला. दुसऱ्या डावात भारतानं दोन बाद २५८ धावा करून डाव घोषित केला. दरम्यान, ५१३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचा संपूर्ण संघ ३२४ धावांवर ढेपाळला.

**भारताचा संघ** : राहुल (कर्णधार), शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (विकेटकिपर), केएस भरत (विकेटकिपर), रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, उमेश यादव, अभिमन्यू, नवदीप सैनी, सौरभ कुमार, जयदेव उनादकट.

## नेवरे येथे लग्नानंतर चार महिन्यातच विवाहितेचा गळा दाबून खून, करमाळ्यात अंत्यसंस्कार

✔ **अकलूज** : लग्नानंतर अवघ्या चार महिन्यातच विवाहितेचा गळा दाबून खून झाल्याची घटना घडली आहे.माळशिरस तालुक्यातील नेवरे गावात खुनाची घटना घडली असून पोलिसांनी मयत विवाहितेच्या सासरकडील लोकांना अटक केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, करमाळा येथील कोमल सुभाष यादव हिचा चार महिन्यापूर्वी नेवरे (ता. माळशिरस) येथील गणेश पांडुरंग गायकवाड याच्याशी थाटामाटात दि. २० ऑगस्ट २०२२ रोजी विवाह नेवरे येथे झाला होता.

लग्नानंतर कोमल गणेश गायकवाड या नवविवाहितेला सासू मनीषा व सासरा पांडुरंग गायकवाड व नवरा गणेश तिघे मिळून मानसिक त्रास देत होते. लवकर उठण्यापासून ते चुलीवरचा स्वयंपाक येत नाही तसेच माहेरी फोन करू न देणे अशा प्रकारचा मानसिक त्रास देत होते. त्याच प्रमाणे तुझ्यापेक्षा मला सुंदर मुलगी मिळाली असती. अजूनही मला चांगले चांगले स्थळ येत आहेत, असे म्हणत नवरा गणेश मानसिक व शारीरिक त्रास देत होता. पंधरा हजार रुपये माहेरून आणून दे, म्हणून दि. १८ डिसेंबर २०२२ रोजी कोमलला सासू सासरा व नवरा गणेश यांनी बेदम मारहाण करून तिच्या बरगड्या तोडून नरडे दाबून तिचा खून केला व खून उघडकीला येऊ नये म्हणून तिने फास घेतला असा फाशी घेतल्याचा बनाव केला अशा आशयाची फिर्याद कोमलची आई राणी सुभाष यादव यांनी अकलूज पोलिसात दिली आहे.सदर घटनेचा तपास स.पो.नि,एस.डी कांबळे या करीत आहेत.

**माहेरच्या लोकांना अनपेक्षित धक्का** : कोमलच्या माहेरकडील यादव कुटुंबाला आपली मुलगी सिरीयस आहे न्यायला या, असे म्हणून फोन केला. यावेळी यादव कुटुंबातले सदस्य अकलूज येथे गेले असता मुलगी कोमल मरण पावली असून तिचे अकलूज उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन सुरू असल्याचे सांगण्यात आले.यावेळी कुटुंबीयांना अनपेक्षित धक्का बसून क्षणात वातावरण बदलले. अत्यंत गरिबीतून कोमल यादव हिने बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले होते. नेवरे भागातील चांगला बागायतदार शेतकरी नवरा मिळाला म्हणून संपूर्ण यादव कुटुंब आनंदी होते. तो आनंद अल्पकाळच टिकला.अवघ्या चार महिन्यातच कोमलचा दुर्दैवी अंत यादव कुटुंबाला पहावा लागला. या प्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात नवरा गणेश पांडुरंग गायकवाड, सासू मनीषा पांडुरंग गायकवाड, सासरा पांडुरंग रामचंद्र गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.खून करणे व मानसिक त्रास देणे व पुरावा नष्ट करणे असा गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी या तीन आरोपींना तात्काळ अटक केली.

## घोडातांडा येथे लाथाबुक्क्यांनी मारहाण, वृद्ध इसमाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

शेतजमिनीच्या वादातून लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत ७५ वर्षाचे वृद्ध जखमी होऊन उत्तरादरम्यान रूग्णालयात मरण पावले. ही घटना घोडातांडा (ता.दक्षिण सोलापूर) येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.

बिल्लू बद्दू चव्हाण (वय ७५ रा.घोडातांडा) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास ते शेतातील घरात बसले होते. त्यावेळी शेतीच्या वादातून त्यांना विजय पांडुरंग चव्हाण, अजय चव्हाण आणि अन्य ६ जणांनी मारहाण केली होती. त्यांना जखमी अवस्थेत सीताबाई चव्हाण (पत्नी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान बिल्लू चव्हाण हे बुधवारी सकाळी मरण पावले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

मयत बिल्लू चव्हाण यांना मंगळवारी दुपारी मारहाण झाली होती. त्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रात्री उशिरा मारहाण झाल्याची एमएलसी दाखल झाली. त्यानंतर ते सकाळी मयत झाले. शवविच्छेदनाचा अहवाल आणि त्याप्रमाणे तक्रार दाखल झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येईल.

**- बाळकृष्ण हनपुडे-पाटील**
(व.पो.नि. विजापूर नाका पो. ठाणे)

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हे 'खोके- बोके ' अजुन किती दिवस चालणार आहे?

| कल्याण |
|---|
| 240-61-227 |

| मेन बाजार |
|---|
| 168-52-390 |

## जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्षाची स्थापना

### मुख्यमंत्री दर महिन्याला घेणार तक्रारींचा आढावा

✔ **सोलापूर** : शासनाच्या आदेशाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा स्तरावरील मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचे क्षेत्रीय कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. शासना पातळीवरील प्रलंबित प्रश्न आणि तक्रारीचे दाखल करत येणार आहेत.

या कक्षातील तक्रारीचा आढवा मुख्यमंत्री दर महिन्याला घेणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील पाणी टंचाई शाखा येथे हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. कार्यालयीन वेळेत ते सुरू राहणार आहे. या क्षेत्रीय कार्यालयात प्राप्त झालेल्या ज्या अर्ज, संदर्भ, निवेदनांवर जिल्हा स्तरावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे, अशी प्रकरणे संबंधित जिल्हा स्तरावरील विभागप्रमुखांकडे वर्ग केली जाणार असून, संबंधितांनी त्यावर तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी यावेळी दिल्या. सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न, शासन स्तरावर प्रलंबित असलेली कामे, त्यासंदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, संदर्भ याबाबत शासकीय कार्यवाहीमध्ये अधिकाधिक व प्रभावी लोकाभिमुखता, पारदर्शकता व गतिमानता आणण्याच्या दृष्टीने तसेच, ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवले जाण्यासाठी हा कक्ष उपयुक्त ठरणार आहे.



निवासी उपजिल्हाधिकारी या कक्षाचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी राहणार आहेत. एक नायब तहसीलदार व लिपिकवर्गीय कर्मचारी यांची कक्षासाठी नियुक्ती करण्यात आले आहेत. सर्वसामान्य जनतेकडून मुख्यमंत्री यांना उद्देशून लिहिलेले दैनंदिन प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, संदर्भ या कक्षामध्ये कार्यालयीन वेळेत स्वीकारले जाणार आहेत. ज्या अर्ज, निवेदनांवर जिल्हा स्तरावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे, अशी प्रकरणे संबंधित जिल्हा स्तरावरील विभागप्रमुखांकडे वर्ग केली जाणार आहेत. संबंधित विभागाने त्यावर केलेल्या कार्यवाहीचा शासन स्तरावरील मुख्यमंत्री सचिवालयाकडून दर महिन्याला आढावा घेतला जाणार आहे.

# यशस्वी चळवळ

२०२२ च्या सरत्या वर्षात अनेक घटनांपैकी एक महत्त्वाची घटना म्हणजे स्वयंसहाय्यता गटांच्या म्हणजेच सेल्फ हेल्प ग्रुपच्या प्रयोगाला ३० वर्षे पूर्ण झाली. आज देशभरात सुमारे ९० लाख महिलांचे बचत गट कार्यरत आहेत. हे सर्व गट कोणत्या ना कोणत्या बँकेशी जोडलेले आहेत. म्हणजेच या सर्व गटांचे बँकेत खाते आहे. त्या खात्यात बचत व कर्जाच्या मोठ्या रकमांच्या उलाढाली या महिला करत आहेत. देशभरात मिळून अशा गटांमध्ये सुमारे दहा कोटींहून अधिक महिला सहभागी आहेत. या प्रयोगाची सुरुवात जरी १९९२ मध्ये झाली असली तरी प्रयोगाचे मूळ हे मायरादा या कर्नाटकातील एका स्वयंसेवी संस्थेने १९८७ ते १९९२ या पाच वर्षांत केलेल्या प्रयोगात आहे. त्यावेळेस स्वयंसहाय्यता गट (सेल्फ हेल्प ग्रुप) हा शब्दप्रयोग अस्तित्वात नव्हता. त्याऐवजी फिनेटी ग्रुप म्हणजे एकमेकांना ओळखणाऱ्या, गावातील १५ अथवा २०च्या महिला गटाने दर महिन्यात एकदा किंबहुना पंधरवड्यातून एकदा एकत्र येऊन, काही ठरावीक रक्कम बचत करायची, असा सुरुवातीचा हा प्रयोग होता. सुरुवात अक्षरश: रुपये पाच व दहा या बचतींपासून झाली. यात हे महत्त्वाचे लक्षात घेण्यासारखे आहे की- गटाची रचना ही कोणती तरी सरकारी योजना पदरात पाडून घेण्यासाठी नव्हती. तर आपल्या अडीनडीला कामाला येईल असे भांडवल, स्वतःच्या अल्पबचतींतून पण दीर्घकाळ चालणाऱ्या या बचतीच्या संचयातून उपलब्ध होईल, या विचारातून या योजनेची सुरुवात झाली. याचे दुसरे कारण म्हणजे सहकारी संस्था अथवा सार्वजनिक बँका महिलांना दारात पाय ठेवू द्यायला अक्षरशः नाखूश होत्या. पाच वर्षे चाललेला हा प्रयोग हळूहळू यशस्वी होतोय असे म्हटल्यानंतर शिखर बँक




नाबार्ड यांनी १९९२ मध्ये हे गट व सरकारी बँका यांच्या जोडणीचा कार्यक्रम हातात घेतला. त्यालाच एसएचजी बँक लिंकेज प्रोग्राम या नावाने ओळखले जाते. सुरुवातीच्या काळात केवळ ५०० गटांची स्थापना करणे हे इतके मर्यादित उद्दिष्ट नाबार्डने ठेवले होते. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांचे प्रशिक्षण, जिल्ह्या-जिल्ह्यातील बँकांच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात जाणीव जागृतीचेही काम नाबार्ड व त्याच्या सहयोगी संस्था व स्वयंसेवी संस्थांनी केले. या सुमारास रिझर्व्ह बँकेनेही या प्रयोगाची दखल घेण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे अनौपचारिक व ज्यांची अधिकृत नोंदणी झालेली नाही, अशा गटांनाही बँकेमार्फत त्यांच्या बचतींच्या अमुक पट कर्ज रक्कम उपलब्ध होऊ शकेल असे, महत्त्वाचे धोरण बँकांनी मांडले. यानंतर मात्र, २००० नंतरच्या गेल्या २२ वर्षांत अक्षरश: चक्रवाढ व्याज या पद्धतीने बचत गटांचे काम हे भारतभर वेगाने सर्व राज्यांत वाढले आहे. सुरुवातीची दहा-पंधरा वर्षे हे गट फक्त दक्षिणेच्याच राज्यात काम करताहेत का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. तथापि गेल्या दहा-पंधरा वर्षांत मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तरप्रदेश, राजस्थान, बिहार व पूर्वांचलमधल्याही छोट्या छोट्या गावांत व जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारचे स्वयंसहाय्यता समूह मोठ्या प्रमाणात स्वयंसेवी संस्थांच्या व बँकांच्या माध्यमातून उभारण्यात आले आहेत. अनेक राज्य सरकारांनी या सर्व मोहिमेमध्ये आणखी हातभार लावला. त्या त्या राज्यांमध्ये उदाहरणार्थ तमिळनाडू, मध्य प्रदेश, महाराष्ट्रात महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अशा महिलांच्या संस्थांनीही बचत गटाच्या मोहिमेला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. हा सर्व पाठिंबा देत असतानाच बँकाही या पद्धतीने उत्साह दाखवत पुढे आल्या. त्यांना लक्षात आले की-महिलांना बचत गटात कर्ज दिल्यानंतर त्याची परतफेड ही जवळपास ९८-९९% टक्के होते आणि ती वेळेत होते. त्यामुळे हे गट बँकेला जोडणे हे बँकांनाही व्यवसायाच्या दृष्टीने फायदेशीर आहे हे त्यांच्या उशिरा का होईना पण लक्षात आले. ५०० गटांपासून सुरू झालेला हा स्वयंसहाय्यता समूहाचा प्रयोग आज केवळ भारतभर नव्हे तर परदेशातही अनेक राष्ट्रांमध्ये वेगाने पसरला आहे. या प्रसारामध्ये सर्वात महत्त्वाचे योगदान हे एकात्मिक पर्यावरणाचे आहे. आज भारतभर स्टार्टअपचे वातावरण आहे. त्यांची वाढ गुणिले क्ष अशी मोजली जाते. कोणत्या उद्योगाने दोन वर्षांत पाचपट, दहापट, वीसपट वाढ केली, त्यावर त्या उद्योगाची बाजारपेठेतील मूल्य धरले जाते. एका अर्थाने हे नैसर्गिक वाढीस धरून नाही. विकासाची कोणतीही प्रक्रिया 'पी हळद नि हो गोरी' अशी होत नाही. ही चळवळ म्हणजे एका अर्थाने नागरिकांचीच चळवळ आहे. लोकशाही सुदृढ करण्याच्या या प्रक्रियेची पुढची ३० वर्षे ही अशीच सुदृढ व भक्कम होवो, अशी अपेक्षा या निमित्ताने करण्यास हरकत नाही.

## राजकीय

# महाआघाडीची फसवाफसवी

**गेले सहा महिने एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर महाआघाडीच्या नेत्यांचा रोज हल्लाबोल चालू आहे. उद्धव ठाकरे यांना शरद पवारांनी दिलेले मुख्यमंत्रीपद, एकनाथ शिंदे यांनी काढून घेतले ही त्यांना मोठी बोच आहे. राज्यात उद्धव ठाकरे गट, काँग्रेस व राष्ट्रवादीला पुन्हा लवकर सत्ता मिळणे मुष्कील आहे. म्हणूनच शिंदे-फडणवीस सरकारच्या विरोधात वातावरण निर्मिती करण्यासाठी त्यांनी एकत्र येऊन मुंबईत मोर्चा काढला. शरद पवार, उद्धव ठाकरे, अजित पवार, नाना पटोले असे दिग्गज नेते मोर्चात होते. उद्धव ठाकरे हे त्यांच्या परिवारासह प्रथमच या मोर्चात दिसले. मोर्चात राणा भीमदेवी थाटात भाषणे झाली. महापुरुषांचा अवमान खपवून घेणार नाही, असा इशारा दिला. राज्यपालपदावरून भगतसिंग कोश्यारी यांना हटवले नाही, तर महाराष्ट्र पेटून उठेल, अशीही महाआघाडीच्या नेत्यांनी धमकी दिली. महाआघाडीच्या मोर्चाला प्रतिसादच नव्हता.**



मोर्चाचे वास्तव मांडल्यावर आघाडीच्या नेत्यांनी निदान आत्मपरीक्षण तरी करायचे. पण सहा वर्षांपूर्वीच्या मराठा मूक मोर्चाचे फोटो ट्वीट करून महाआघाडीच्या मोर्चाला किती विराट गर्दी असे भासविण्याचा प्रयत्न केला गेला. ज्या दिवशी मोर्चा निघाला, त्याच दिवशी केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी ट्वीट करून मुंबईत ९ ऑगस्ट २०१७ रोजी निघालेल्या मराठा मूक मोर्चाची आठवण करून दिली. लाखोंच्या संख्येने निघालेला मराठा मोर्चा कुठे व महाघाडीच्या सात-आठ पक्षांनी मिळून काढलेला मोर्चा कुठे? हे त्याच दिवशी उघड झाले. गर्दी जमवताना महाआघाडीला नाकीनऊ आले. २५-३० हजार जमवतानाही आघाडीला घामटे फुटले. पैसे देऊन अनेकांना मोर्चात आणले होते हे व्हीडिओ क्लिपवरून स्पष्ट झाले.

मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील मुंबई काँग्रेसच्या कार्यालयासमोरच मोर्चात सामील झालेल्या तरुणांना नोटांचे वाटप चालू होते. याचे व्हीडिओ व्हायरल झाले. ग्रामीण भागातून व मतदारसंघातून आणलेल्या गोरगरीब बाया-बापड्यांना आपल्याला मुंबईत कशासाठी आणले आहे व मोर्चा कशासाठी आहे हे ठाऊकच नव्हते. त्यांच्या मुलाखतींनी महाआघाडीची फसवाफसवी जनतेसमोर उघड झाली. अनेकांच्या हातात घोषणांचे फलक होते. पण त्या घोषणा कशासाठी आहेत, कोणाच्या विरोधात आहेत, आपण ते फलक का हातात धरले आहेत?, हे मोर्चातील लोकांना सांगता येत नव्हते. अफाट गर्दी असलेल्या मराठा मोर्चाचे व्हीडिओ शेअर करून तो महाआघाडीचा मोर्चा असल्याचा उद्योग काहींनी केला. पण वास्तव बाहेर येताच तो व्हीडिओ त्यांच्याच अंगलट आला. मराठा मोर्चाचे व्हीडिओ चित्रण दाखवणे हा खोडसाळपणा असल्याचे भाजपचे आक्रमक आमदार नितेश राणे यांनी सर्वप्रथम उघड केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज असल्याचे पुरावे द्या अशी मागणी जे करीत होते, मराठा क्रांती मोर्चाला मुका मोर्चा म्हणून जे हिणवत होते, तेच मराठा मोर्चाचे फोटो टाकून खोटारडेपणा करीत राहिले. महाआघाडीच्या मोर्चाकडे आघाडीच्या अनेक नेत्यांनी पाठ फिरवली होती, हेही नंतर पुढे आलेच. गेले महिनाभर उद्धव ठाकरे गटाशी युती करणार, शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येणार, अशा वल्गना करणारे कुठे होते? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केल्यावर कम्युनिस्टांची मुंबईतील सद्दी संपवली. त्याच डाव्या पक्षांचे नेते मोर्चात सहभागी झालेले दिसले. महाघाडीचा मोर्चा असला तरी काँग्रेसने फार ताकद लावली असे चित्र दिसले नाही. शिवसेनेचे चाळीस व समर्थक १० असे ५० आमदार उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वापासून दूर झाल्याने उद्धव गटावर मोठा परिणाम झाला आहे. गर्दी जमवणारे व सभा-मोर्चाचे व्यवस्थापन करणारे दिग्गज नेते हे आज एकनाथ शिंदे यांच्याबरोबर आहेत. मग मोठा मोर्चा निघणार तरी कसा?

राज्यपाल हटाव, हे महाआघाडीचे टार्गेट आहे. पण जोडीला सीमाप्रश्न त्यांना मिळाला. नागपाड्यातील रिचर्डसन क्रुडासपासून निघालेल्या मोर्चावर भेंडी बाजारात म्हणे पुष्पवृष्टी झाली, हे बोलके उदाहरण आहे. भेंडी बाजारातील लोकांना उद्धव गटाविषयी गेल्या तीन वर्षांपासून विशेष प्रेम वाटू लागले आहे, याचे श्रेय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला दिले पाहिजे. महाआघाडीच्या मोर्चाविषयी सर्वसामान्य मुंबईकरांना काहीच देणे-घेणे दिसले नाही. शनिवार-रविवार सुट्टी व लग्नसराई यामुळे लक्षावधी लोक मुहूर्त गाठण्यासाठी वेळेवर कसे पोहोचावे या विवंचनेत होते. मुंबईतील सर्वच प्रमुख रस्ते, मुंबई-पुणे, मुंबई-गोवा, मुंबई-नाशिक हे महामार्ग वाहतूक कोंडीने गच्च होते. ट्रॅफिक जाममध्ये अडकलेल्या लाखोंना मुंबईतील मोर्चात काहीच रस नव्हता.

राज्यपालांची नियुक्ती हे राष्ट्रपती करतात. राज्यपाल हे घटनात्मक पद आहे. देशात अनेक राज्यांत जिथे भाजपविरोधी सरकार आहे हे तिथे सरकार विरुद्ध राज्यपाल असा संघर्ष चालू आहे. पश्चिम बंगाल, केरळ, तेलंगणा, पंजाब, छत्तीसगड, राजस्थान या राज्यांत हे वाद आहेत. महाराष्ट्रात मात्र, सत्ता गमावलेले पक्ष राज्यपाल हटाओ मोहीम चालवत आहेत. राज्यपाल हटविण्याच्या मागणीसाठी कोणत्या राज्यात मोर्चे निघाले नाहीत. पण महापुरुषांच्या अवमानाचे निमित्त करून महाराष्ट्रात महाआघाडीने राज्यपालांना टार्गेट केले आहे. राज्यपालांच्या प्रतिमेला रावणाची १० तोंडे लावून त्याचे मोर्चात प्रदर्शन करण्यात आले. राज्यपालपदाची जाहीर विटंबना करताना कोणालाच काही वाटले नाही. राज्याची सत्ता मिळविण्यासाठी तीन पक्ष एकत्र आले, सत्ता गमावल्यानंतरही आम्ही एकत्र आहोत आणि भाजपला विरोध आमचा कायम आहे, हाच संदेश त्यांनी दिला. सपा, सीपीआयएम. सीपीआय, शेका पक्ष, जनता दल यू आदींनी मोर्चाला पाठिंबा दिला होता. शिंदे-फडणवीसांच्या विरोधात एकत्र राहिल्याशिवाय त्यांना पर्याय राहिलेला नाही.

देवेंद्र फडणवीस यांनी नॅनो मोर्चा असे केलेले वर्णन किंवा एकनाथ शिंदे यांनी आमची कोकणातील सभा मोर्चापेक्षा मोठी होती, असे सांगणे हे महाआघाडीला चांगलेच झोंबले. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांचा काँग्रेसने वेळोवेळी अवमान केला तेव्हा महाआघाडीतील कोणीही निषेधाचा ब्र काढला नव्हता. अकेला देवेंद्र क्या करेगा, अशी दर्पोक्ती करणाऱ्यांना रस्त्यावर उतरण्याची पाळी आली. महाआघाडीच्या मोर्चानंतर सोशल मीडियावर एक पोस्ट दिसून आली. सत्तेवर असताना राज्याला लुटायचे आणि गेली की राज्याला पेटवायचे.

**- सुकृत खांडेकर.**

## टुडेज ब्लॉग

# जरा खात्याकडेही लक्ष द्या !

**शैक्षणिक वर्षातले सहा महिने सरले, तरी अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रियाच पूर्ण झालेली नाही. आता उरलेल्या वेळात शिकणार काय आणि परीक्षा देणार काय, हा प्रश्न हजारो विद्यार्थ्यांपुढे उभा राहिला आहे. राजकारण आणि आरोप-प्रत्यारोपांतून वेळ मिळाला, तर खात्याच्या कामकाजाकडे लक्ष देण्याचा सरकारचा बेत दिसतोय. इंजिनिअरिंगचे प्रवेश आत्ताच झाले! विधी शाखेचे प्रवेश नुकतेच पार पडले. बीएड प्रवेश अजूनही प्रवेश फेऱ्या सुरूच. फार्मसीचे प्रवेश अजूनही प्रक्रिया सुरू!**

राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची ऐन डिसेंबरअखेर ही स्थिती आहे. अनेकांना तर अद्याप प्रवेश मिळाले नाहीत. कोरोना आणि लॉकडाउनच्या काळात शिक्षण व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आणि परीक्षा, प्रवेश असे सारे वेळापत्रक विस्कळीत झाले होते. आता कोरोना सरला, लॉकडाउनही संपला; पण राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग अजून गेल्या दोन वर्षांच्या मानसिकतेतून बाहेर आल्याचे दिसत नाही. नियमित शैक्षणिक वर्षात डिसेंबर-जानेवारीपर्यंत एक सत्र समाप्त होते. यंदा मात्र अनेक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक कामकाज आत्ता कुठे सुरू झाले आहे, काही अभ्यासक्रमांमध्ये तर अजूनही प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्याच सुरू आहेत. सरकारी संस्थांमध्ये सुरू असलेल्या सावळा गोंधळामुळे हजारो विद्यार्थ्यांचे सहा महिने हकनाक वाया गेले आहत. ही स्थिती कशामुळे उद्भवली?

गेल्या वर्षी दहावी-बारावीच्या परीक्षा वेळेत होऊन निकालही लागले. अभियांत्रिकीसारख्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणारी सामायिक परीक्षाही (सीईटी) पार पडली. विविध १७ अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या या परीक्षेस राज्यात सुमारे आठ लाख विद्यार्थी बसतात, यंदा सुमारे दहा लाख विद्यार्थ्यांची नोंदणी त्यासाठी झाली होती. मात्र, त्यानंतर सीईटी सेलच्या कूर्मगतीमुळे अनेक अभ्यासक्रमांची प्रक्रिया सुरू होण्यास प्रचंड विलंब झाला. वेळेत आदेश प्रसिद्ध न करणे, प्रवेशफेऱ्यांचे वेळापत्रक वेळेत प्रसिद्ध न होणे, असे प्रकार समोर आले. ऐन दिवाळीतही प्रवेशाची प्रक्रियाच सुरू होती. यामध्ये विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव ठळकपणे जाणवला. प्रवेश प्रक्रियेतही समन्वय नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याची प्रतीक्षा करावी लागली. विधी शाखेसारख्या अभ्यासक्रमासाठी तर एका बाजूला विद्यार्थ्यांना हव्या त्या महाविद्यालयात प्रवेश मिळाले नाहीत, तर त्याच महाविद्यालयांमधील जागा अजूनही रिक्त असल्याने अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला आहे. या गोंधळानंतर प्रत्यक्ष शिकण्या-शिकविण्याचे कामकाज सुरू होण्यासच डिसेंबर-जानेवारी उजाडला, तर उरलेल्या तुटपुंज्या काळात हे विद्यार्थी अभ्यासक्रम कसा आणि काय शिकणार, हा प्रश्नच आहे. विशेषत: पहिल्या सत्रातच अभ्यासक्रम घाईत उरकला गेला, तर पुढील अभ्यासाचा पाया कच्चा राहण्याची भीती आहे.




या कूर्मगतीसाठी कोरोनाचे कारण अजूनही पुढे केले जात आहे; परंतु एकीकडे सर्व खासगी विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया वेळेत होते, मग फक्त 'सीईटी सेल' च्या कामकाजातच कोरोनाचा व्यत्यय कसा येतो, या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेही नाही. कदाचित खासगी विद्यापीठांमधील जागा रिकाम्या राहू नयेत, यासाठीच या प्रक्रियेला विलंब होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तो खोटा ठरवायचा असेल, तर ही प्रक्रिया वेळेत आणि पारदर्शकपणे होणे आवश्यक आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचा हा गोंधळ सुरू असतानाच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिकाही अनेक विद्यार्थ्यांना मिळाल्या नसल्याने त्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशावर टांगती तलवार निर्माण झाली आहे. करोना काळात परीक्षा व निकालास विलंब झाल्याने 'एमबीए, एमसीए' अशा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन गुणपत्रिकांच्या आधारे प्रवेश देण्यात आले. आता त्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू झाल्यावर छापील गुणपत्रिकेची मागणी संबंधित संस्थांकडून करण्यात येत आहे. मात्र, अजून अनेकांना त्या मिळालेल्या नाहीत. याबाबत विद्यापीठ आणि महाविद्यालये परस्परांकडे बोट दाखवित आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागले, तर दोष कोणाचा?

खरे तर हा प्रकार समोर आला, तेव्हा लवकरच सारे सुरळीत होईल' असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले होते. मात्र, त्यानंतरही परिस्थिती सुधारलेली नाही. राजकारण आणि आरोप-प्रत्यारोपांतून वेळ काढून सर्वांनी खात्याच्या कामकाजातही लक्ष घातले, तर विद्यार्थ्यांचे भले होईल.

**- जितेंद्र अष्टेकर.**

## जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ५



थोड्या वेळाने खिशात ठेवला. येथे कोणी कोणाला दान केले? रुपयाचे स्थान बदलले तरी तो तुमच्या जवळच राहिला. 'रुपया कोणाला दान केला' अशी भावना तुमच्या मनात निर्माण झाली नाही. कारण उजवा हात तुमचाच आहे. डावा हात तुमचाच आहे आणि खिसादेखील तुमचाच आहे. त्याप्रमाणे सहजदानाची स्थिती असते.

ज्ञानी पुरुषाजवळ समेष्टिभाव असल्यामुळे ज्याला दान दिले त्याच्या शरीरात देखील आपणच आत्मरुपाने नांदत आहोत या सत्याची त्याला प्रचिती आलेली असते. म्हणून त्याने केलेल्या दानात 'मी दाता आहे' असा अहंभाव नसतो. अशा दानाला 'सहजदान' म्हणतात.

अशाप्रकारे ज्ञानी पुरुषाकडून सहजदान घडते तर सामान्य लोकांकडून सोपाधिक आणि निरुपाधिक दान घडत असते.


कोणत्या का प्रकारचे असेना, पण माणसाने यथाशक्ती दान केले पाहिजे. कारण दानामुळे हृदय उदार होते, विशाल होते. मनाची विशालताच आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. म्हणून प्रत्येक मनुष्याने दान करावे. परंतु ते सत्पात्राला, सत्कार्यासाठी करावे. अपात्र व्यक्तीला दान दिले तर त्याचा उपयोग होत नाही.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# सर्कशीला पुनर्जीवन द्यावे

लहान मुले, वृद्ध व साऱ्या अबालवृद्धांना खिळवून ठेवणारी सर्कस आता संपण्याच्या मार्गावर आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वी देशात जवळपास ३०० च्या दरम्यान सर्कसी होत्या. त्यातून हिंस्त्र प्राण्याचे व पक्ष्यांचे खेळ तसेच कसरती अनेक जण पाहत असत. मुलांना या सर्कशीत अनेक प्राणी बघावयास मिळत. हत्ती, उंट, सिंह, वाघ, विविध प्रकारची माकडे यांनी सर्कस भरलेली असायची. सायकलवरून चालणारी विविध कुत्री प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत असत. सर्कशीतील अनेक कलाकार आपली कला झोपासत. कसरतींचे प्रयोग, याद्वारे दाखवीत. आता महाराष्ट्रात केवळ ३ सर्कसी उरल्या आहेत. त्यापैकी दोन केरळीय मालकांच्या आहेत तर एक सर्कस महाराष्ट्रातील सांगली येथील संतोष शिंदे यांची आहे. देशात आता सर्कशीची संख्या केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतपत म्हणजेच १०व्या आसपास आहे.




महाराष्ट्रात सर्कस व्यवसायाची सुरुवात १८७८ साली विष्णुपंत छत्रे यांच्याकडून झाली. ते प्रसिद्ध अश्व तज्ज्ञ होते. यानंतर तासगावचे परशुराम माळी यांची परशुराम सर्कस, कार्लेकर सर्कस अशा सर्कशी निघाल्या व यांनी राज्यभर नावलौकिक मिळविला. ताराबाई शिंदे या शेलार सर्कशीत वाघ सिंह या प्राण्याशी झुंज घेत असत. जगात आज सर्वात जुनी सर्कस गार्डन ब्रदर्स क्राऊन ही आहे. तिचे वय आता १०० वर्षांहून अधिक आहे. सर्कसची सुरुवात जगात इंग्लंडमध्ये १७६८ साली झाली. अलिकडे वन्य प्राणी कायद्यानुसार सर्कशीमध्ये हिंस्त्र प्राणी व पक्षी यांना बंदी आहे. त्यामुळे असे प्राणी आता सर्कशीत ठेवता येत नाहीत. मध्यंतरी जवळपास दोन वर्षे कोरोनाची साथ होती त्या काळात सर्कशीचा व्यवसाय जवळपास बंद पडला. त्यातून जी उरली सुरली सर्कस होती ती बंद पडली. आजही या सर्कशीला प्राणी कायद्याची बंधने पाळून पुनर्जीवन करणे शक्य आहे. फक्त कलाकारांचे कसरतींचे प्रयोग ठेवून सर्कस चालू करता येईल. त्यासाठी सरकारने वित्तीय व प्रशासकीय साहाय्य द्यावे. जनतेने सुद्धा याला सक्रिय मदत करावी व ह्या आबालवृद्धांच्या आवडत्या सर्कशी पुन्हा सुरु कराव्यात.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# राष्ट्रीय गणित दिनानिमित्त...

# सक्रिय गणित काळाची गरज

**भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा २२ डिसेंबर हा जन्मदिन प्रत्येक वर्षी 'राष्ट्रीय गणित दिन' म्हणून साजरा केला जातो. शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना गणित विषयाची गोडी लागावी, तसेच गणितीय दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठी गणित दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.**

दैनंदिन जीवनात गणिताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मोजमाप, गणना, हिशोब, तर्क, अंदाज, एकीकरण, पृथःकरण, निकष, सचोटी आणि निवड या गणितातील अगदी प्राथमिक आणि मूलभूत रिती, पद्धती व संकल्पना होय. ज्ञानाच्या संपूर्ण प्राप्तीसाठी आणि आकलनासाठी माणसाला ज्ञानेंद्रियांशिवाय गणिताची नितांत आवश्यकता असते.


विद्यार्थ्यांना शिकवल्या जाणाऱ्या सर्व विषयांपैकी गणित हाच एक विषय असा आहे की त्याबाबत सार्वत्रिक चिंता असते. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर गणित विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दोन प्रकारचा असतो. गणित विषय आवडीने अभ्यास असणारे विद्यार्थी नेहमीच उच्च श्रेणी मिळवतात. कदाचित गुणवत्ता यादीत येतात. पण हे प्रमाण एकूण विद्यार्थी संख्येच्या तुलनेत अतिशय कमी असते. दुसऱ्या बाजूला गणित विषय अतिशय अवघड व आपल्याला जमणार नाही, अशी संकल्पना घेऊन या विषयापासून दूर राहणाऱ्यांची संख्या जास्त दिसून येते.

**भारत हा गणितज्ञांचा देश :** गणित व इंग्रजी विषयांना विद्यार्थ्यांच्या अंगावर शहारे आणणारे विषय समजले जातात. इंग्रजीचे एक ठीक आहे, ती भाषा मातृभाषा नसल्यामुळे कदाचित शिकायला अवघड जात असेल पण गणिताच काय? आर्यभट्ट, भास्कराचार्य, आसा, बौद्धयाना, पाणिनी, रामानुजन अशा थोर भारतीय गणितज्ञांनी गणित शास्त्र समृद्ध करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले आहे. अशा थोर गणितज्ञ यांचा वारसा आपण सांगतो मात्र, पाश्चिमात्यांनी भारतीय गणित पद्धतीचा अभ्यास करून त्यांनी स्वतःची प्रगती केली पण आज केवळ आपल्या दुर्लक्षामुळेच गणित हा विषय आपल्या विद्यार्थ्यांना अवघड वाटतो आहे. भारताचे गणितातील गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी व 'इंडिया इज कंट्री ऑफ मॅथेमॅटिशन' ही आपल्या देशाची ओळख भविष्यातही टिकवण्यासाठी शासन दरबारी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**गणिताविषयी गैरसमज :** गणित विषय रुक्ष व कठीण आहे, गणित विषय आत्मसात करण्याची क्षमता मोजक्या व्यक्तींमध्ये असते असा गैरसमज गणितात अपयशी ठरलेल्या मित्र व भावंडांनकडून कळत-नकळत पसरवले जातात. अशा प्रकारच्या गैरसमजामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गणित या विषयाची नावड कायमपणे निर्माण होते. यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालक यांनी हे एकदा मान्य केले पाहिजे की, गणित विषय फार अवघड नाही व तो फार सोपा ही नाही, तर गणित विषय हा वेगळा आहे. हे समजून घेऊन ते विद्यार्थ्यांना पटवून सांगणे गरजेचे आहे. इतर विषयांपेक्षा गणित विषयाची अभ्यास पद्धती कशी वेगळी आहे, हे का एकदा समजून घेतले की, तुमचा पालक किंवा शिक्षक म्हणून पाल्य किंवा विद्यार्थी यांच्याशी योग्यप्रकारे संवाद सुरू होण्यास मदत होते.

**गणिताची भीती घालवण्यासाठी :** विद्यार्थ्याला एखाद्या विषयाची भीती वाटत असेल तर शिकण्यातील रस कमी होऊन तो त्यापासून लांब पळू लागतो. पण तोच जर विषय आवडायला लागला की तो सोप्पा ही वाटतो आणि त्या शिकण्यातून आनंद मिळवता येतो. विद्यार्थ्यांना गणिते सोडवायला सांगितले की, त्यांच्या कपाळावर आठ्या पडतात. पण गणिती खेळाद्वारे नवनवीन क्लुप्त्याद्वारे गणितीय उदाहरणे ते सहज सोडवतात. म्हणून गणितातील भीती घालवण्यासाठी प्रत्यक्ष प्रयोगाच्या माध्यमातून गणित शिकवणे गरजेचे आहे.

आजच्या स्पर्धात्मक संगणकीय युगात गणिताशिवाय तरणोपाय नाही. म्हणून शिक्षकांनी व्यवहारी व अत्यंत सोप्या गणिताच्या मूलभूत प्रक्रिया साधनांचा वापर करून सहजपणे विद्यार्थ्यांसमोर ठेवून हा विषय मी सहजपणे शिकू शकेल, असा आत्मविश्वास मनामध्ये निर्माण करणे ही मूलभूत गरज आहे. आत्मविश्वास निर्माण झाला की साहजिकच गणित या विषयाची भीती दूर होऊन आवड निर्माण व्हायला लागते.



**गणित प्रयोगशाळा :** गणिताच्या शिक्षकाला खडू-फळा न वापरता शिकवणे अवघड असते. हा सामान्यतः सर्व शिक्षकांचा अनुभव आहे. त्यामध्ये असलेली आकडेमोड, सूत्रांचा वापर कुटप्रश्न सोडवण्यासाठी लागणाऱ्या अमूर्त आणि प्रात्यक्षिकांचा अभाव यामुळे गणित हा विषय वृक्ष वाटून त्याबद्दल गोडी निर्माण होत नाही. प्रसिद्ध चिनी म्हणीप्रमाणे, मी ऐकलं-मी विसरलो, मी पाहिले -माझ्या लक्षात राहिले, मी केले-मला समजले. यातील 'करणे' व 'समजणे' होण्यासाठी गणित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवनिर्मितीचा ध्यास घेऊन विद्यार्थ्यांना सक्रिय करणे आवश्यक आहे. यासाठी गणित सक्रिय पद्धतीने शिकवण्यासाठी गणित प्रयोग शाळांची नितांत आवश्यकता आहे.

गणित विषय आवडीचा, आनंददायी होण्यासाठी एकंदरीतच गणिताचा, 'गणितोत्सव' साजरा करण्यासाठी, विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्याला आपण होऊन शिकावेसे वाटेल असे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. 'गणित' हा केवळ एक विषय नसून, विविध क्षमता विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे. गणिताच्या अध्ययनामुळे पद्धतशीरपणे, आत्मविश्वास, चिकाटी, स्वावलंबन, विचारशक्ती, तर्कशक्ती, नेमकेपणा, अचूकता, एकाग्रता या गुणांचा विकास होतो.यातून व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो. गणिताच्या माध्यमातून विविध स्पर्धा परीक्षा, नवनवीन शिक्षणातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे गरजेचे आहे. सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी गणित विषय सक्रिय करण्यासाठी,ज्ञानरचनावादी, गणित प्रयोगशाळा निर्माण करण्यासाठी शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**- डॉ. प्रशांत चाबुकस्वार, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# नगर अभियंता व आरोग्य विभागाची आयुक्तांनी घेतली आढावा बैठक

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील नगर अभियंता व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी आज आढावा बैठक घेतली. विविध योजना, प्रकल्प व प्रकरणे मार्गी लावण्यासंदर्भातील आदेश त्यांनी दिले.



महापालिका आयुक्तांनी नगर अभियंता आणि आरोग्य विभागाचा बुधवारी आढावा घेतला. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विविध प्रकरणांची सविस्तर माहिती घेतली. या दोन्ही विभागातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. शासन निधी आणि डीपीसी मंजूर निधी शिवाय येणाऱ्या निधीसंदर्भात माहिती घेऊन आयुक्तांनी ही प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे आदेश दिले. आरोग्य विभागाकडून शासन निर्देशानुसार सध्या शहरात गोवर रूबेला लसीकरण मोहीम सुरू आहे यासाठी अधिक लक्ष केंद्रित करण्याचे आदेश आरोग्य अधिकाऱ्यांना दिले असल्याचे आयुक्त शितल तेली - उगले यांनी सांगितले.

## ▪ प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचे दिले आदेश

### गड्डा यात्रेसंदर्भात महापालिकेत लवकरच बैठक

सोलापूर शहरात होम मैदान परिसरात भरणाऱ्या श्री सिद्धेश्वर यात्रेबाबतीत विविध नियोजनासह विविध उपाययोजना पार पाडण्यासंदर्भात महापालिका लवकरच संबंधित सर्व विभागांची बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. यानंतर झालेले नियोजन आणि निर्णय जिल्हाधिकाऱ्यांकडे कळविण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.


### शहरातील ५ बीओटी प्रकल्प मार्गी लागणार

सोलापूर शहरात विविध पाच ठिकाणी महापालिकेच्या वतीने बीओटी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रलंबित प्रकल्पांचा आयुक्तांनी आढावा घेतला. संबंधितांना याचे टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.



## निमगावमध्ये के.के.पाटील यांच्या नेतृत्वाखालील ग्रामविकास पॅनलचे वर्चस्व

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील निमगाव येथील ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकींत भाजपचे सोलापूर जिल्हा सहप्रभारी तथा महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य के के पाटील यांच्या नेतृत्वाखालील ग्रामविकास पॅनलने १७ पैकी १२ जागा जिंकत तब्बल १२ वर्षानंतर ऐतीहासीक विजय संपादन केला. निमगाव ग्रामपंचायत निवडणुकींत पारंपरिक विरोधी गट के के पाटील व रावसाहेब मगर यांच्यात लढत झाली.यामध्यें यंदाच्या निवडणुकींत भाजपचे जिल्हा सहप्रभारी के के पाटील गटाने बाजी मारली यामध्ये सरपंच पदाचे उमेदवार सुभाष साठे यांनी रावसाहेब मगर गटाचे राजेंद्र तोरणे यांचा २४६ मतांनी पराभव केला. यामध्ये के के पाटील गटाचे सरपंच पदाचे उमेदवार सुभाष साठे,तर सदस्य पदाचे उमेदवार जनाबाई पवार, कल्याण बोडरे, मनीषा साठे, प्रताप मगर, अर्चना मगर, अर्चना मंडले, प्रतीक मगर, संध्या मगर, किरण पाटील कविता पाटील, सोनाली थोरात, अंकुश जाधव, विकास तोरणे, दिगंबर साठे, वृषाली मगर हे उमेदवार विजयी झाले तर विरोधी गटामधुन ५ सदस्य विजयी झाले यामध्ये अर्चना मंडले व जयश्री शेंडे यांना समसमान मते पडल्याने चिठ्ठी टाकुन अर्चना मंडले यांना विजयी घोषीत करण्यात आले. तर प्रतीक रावसाहेब मगर हे फक्त एका मताने विजयी झाले.तर माजी विद्यमान सरपंच आरती मगर यांचा प्रभाग दोनमधुन के के पाटील गटाच्या अर्चना मगर यांचा तब्बल १०% मतांनी पराभव केला. यामुळे गत पंचवार्षिक निवडणुकींत सत्तेत असणाऱ्या गटाला फक्त ५ जागेवर समाधान मानावे लागले. निवडीनंतर सर्व विजयी उमेदवाराचा सन्मान भाजपचे महाराष्ट्र कार्यकारीणी सदस्य के के पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्या ज्योतीताई पाटील, निमगाव विकास सेवा सोसायटीचे चेअरमन वसंतराव पाटील, अड धैर्यशील पाटील, सांगोला सूतगिरणीच्या संचालीका शुभांगी पाटील यांनी अभिनंदन व सत्कार केला. विजयानंतर भाजपा कार्यकारिणी सदस्य के.के.पाटील यांनी निमगाव ग्रामपंचायतीच्या सत्तेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे सांगीतले.



## शिक्षणाद्वारे सामाजिक मूल्यांची पुनर्स्थापना करावी : सहायक पोलीस आयुक्त आर्वे

✔ **सोलापूर** : सामाजिक व मानसिक स्वास्थ्यासाठी स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टिकोन निर्माण करणे गरजेचे आहे. नैतिक मूल्यांच्या संस्कारातून चरित्र घडत असते. तेंव्हा विद्यार्थ्यांनी कोणतेही गैरवर्तन न करता आपले ध्येय गाठवे.असे प्रतिपादन सहायक पोलिस आयुक्त श्री. दिपक आर्वे यांनी केले. अंतर्गत तक्रार समितीच्या जागृती कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की संविधानिक अधिकाराचा उपभोग घेताना इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याचे भान ठेवावे. सामाजिक मूल्यांच्या संस्कारातून स्त्री-पुरूष समानतेच्या भावनेचा विकास करावा. यामुळे स्त्री शोषणाच्या घटना घडणार नाहीत. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून चांगले नागरिक बनावे. आर्वे यांनी कायद्यातील तरतुदी व सरकारी योजनांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. मीना गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी धोरणात्मक बदल स्वीकारून चारित्र्य घडवावे. महापुरुषांचा आदर्श घेऊन देशाचा विकास करावा असे प्रतिपादन केले. समिती प्रमुख डॉ. संगीता भोसले यांनी कार्यक्रमाचा उद्देश्य स्पष्ट करत समितीची माहिती पीपीटी व विडिओ द्वारे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनुराधा क्षीरसागर यांनी केले. परिचय डॉ. मारोती घंटेवाड यांनी करून दिला. आभार प्रा. सुहास उघडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. किशोर जोगदंड यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## बायपास रोडवर दुचाकीस अडवून मारहाण

✔ **बार्शी** : अलीपुर बायपासने दुचाकीवरून बार्शीकडे येणाऱ्यास तिघांनी अडवून मारहाण करून रोख १० हजार रु. व दोन मोबाईल असा ३२ हजाराचा मुद्देमाल चोरून नेणाऱ्या गँगमधील दोन आरोपींस अटक करून बार्शी न्यायालयाचे न्या. एस.एम. सबनीस यांच्या पुढे उभा करताच २३ डिसें.पर्यंत पो.कोठडी सुनावली आहे. याबाबत तिघांवर गुन्हा दाखल करताच त्यातील आरोपी निलेश मंडले अंधारे १९ व जय सुधीर लोखंडे वय २१ दोघे रा.अलीपुर ता.बार्शी याना अटक करून न्यायालयात उभे केले होते. ही लुटमारीची घटना १५ डिसेंम्बर रोजी रात्री ८ च्या सुमारास झाल्याने याबाबत सिराज युंनुस शेख



रा.गुळपोळी ता.बार्शी यांनी १६ डिसेंम्बर रोजी तालुका पोलीसात ज्या दुचाकीवरून आरोपी पळून गेले होते त्याचा एम.एच. १३ डी. पी.८३१३ नंबर दिलेल्या फिर्यादीत दिल्याने त्याचा तपास तालुका पोलिसानी २४ तासात लावून आरोपी हे या बायपास जवळच असलेल्या अलीपुर गावातीलच असल्याची माहिती मिळाल्याने तालुका पोलिसानी यातील दोघांना अटक करून न्यायालयात उभे केले होते. गेली कांही दिवसापासून याच बायपास रोडवरून जाणाऱ्यांना आडविण्याचे घटना घडल्या होत्या. त्याचा तपास डीवायएसपी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदेशनाखाली तालुका सपोनि महारुद्र परजने हेड कॉन्स्टेबल सहदेव देवकर, पो.नाईक अभाजीत गाटे, पो.कॉ. महादेव धुमाळ, अक्षय टोनपे या पथकाने तातडीने तपास करून त्यांनी याच अलीपुर गावातील दोन आरोपींस अटक करून न्यायालयात उभे केले होते.

## कमल बनकर यांचे निधन



✔ **वेळापूर** : वेळापूर नागठाना येथील कमल जंगलु बनकर यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, चार मुली, सुना, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे. त्या पोपट बनकर यांच्या मातोश्री होत.

## रस्ता सुरक्षेचे महत्त्व कळण्यासाठी कवच कक्ष उपायुक्त : जिल्हाधिकारी

✔ **सोलापूर** : शालेय विद्यार्थी हे देशाचे उद्याचे भविष्य आहेत. त्यांना विद्यार्थी दशेतच रस्ता सुरक्षेचे महत्त्व कळणे आवश्यक असून, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरू करण्यात आलेला सुरक्षा कवच कक्ष त्यासाठी मदतीचा ठरेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरक्षा कवच कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांड, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव उपस्थित होते. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर अर्चना गायकवाड यांनी या सुरक्षा कक्षाची माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्ये रस्ता सुरक्षेचे महत्त्व कळावे, याकरिता सुरक्षा कवच स्थापन करण्यात आला आहे. यामध्ये रस्ता सुरक्षेचे महत्त्व विषद करणारे विविध कक्ष स्थापन केले आहेत. जसे की साप शिडी खेळ, रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत स्पर्धा तसेच मुलांना शालेय साहित्याच्या माध्यमातून रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटावे याकरिता पेन पेन्सिल, फ्रेंडशिप बँड, स्टिकर्स, डायरी, ग्रीटिंग्स इत्यादिचे वाटप या कक्षातून केले जाणार आहे.

## ड्रीम फाऊंडेशनतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर

✔ **सोलापूर** : आगामी विविध स्पर्धा परिक्षा भरती तयारी करणाऱ्या युवक युवतींना लेखी परिक्षा मार्गदर्शन करण्यासाठी ड्रीम फाऊंडेशन व चाणक्य गुरुकुल ॲकॅडमीच्या वतीने शनिवार दि.२४ ते २६ डिसेंबर २०२२ दरम्यान सात रस्ता येथील ड्रीम आय.ए.एस. सेंटर सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळेत मोफत मार्गदर्शन शिबीर होणार असल्याची माहिती संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली. नाव नोंदणी साठी (मोबाईल ९८३४३०६३३७) या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन काशिनाथ भतगुणकी यांनी केले आहे.

## अवैधरित्या घरगुती गॅस वापर; सातजणांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील कुंभारी येथील विजय नगरात एका पत्र्याच्या शेडमध्ये अवैधरित्या घरगुती वापराचा गॅस रिक्षात भरताना आढळल्याने वळसंग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोसले, कुंभारीचे पोलीस उपनिरीक्षक उस्मान शेख व त्यांच्या पथकाने तेथे छापा टाकून रिक्षात घरगुती गॅस भरताना आढळलेल्या सात जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून गॅसच्या टाक्या, वजन काटे, तीन चाकी ४ रिक्षा असा जवळपास २ लाख ७८ हजारचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणात नागेश धर्मा नडगुंबे (वय-३७, रा.समाधान नगर, अक्कलकोट रोड), असिफ रफिक पठाण (वय-२८, रा.संजय नगर, मस्जीद जवळ,कुमठा नाका), बापु मल्हारी शिंगाडे (वय-४५,रा.पाथरूट चौक) राजु अंबादास गोकरे (वय-३२,रा.गेंटयाल चौक) संगपाल रेणसिध्द मैदर्गीकर (वय-३०,रा.मिलींदनगर, बुधवार पेठ),अविनाथ त्रिक घाटे (वय-४५ रा, जगदंबानगर, अकाशवाणी केंद्र सोलापूर) हे अवैधारित्या घरगुती गॅस रिक्षामध्ये भरून घेणेकरीता रिक्षासह थांबलेल्या स्थितीत मिळून आले आहे. तसेच या व्यवसायाचा मालक लक्ष्मण सभा रुचनभैरे (रा.विजय नगर सोलापुर) या सर्वांच्या विरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोसई शेख हे करित आहे.

## अखेर कारंजेंचे कार्यालय सजले

✔ सुराज्य/सोलापूर

नव्याने नियुक्त झालेले अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना कोणते दालन मिळणार याची चर्चा महापालिकेत होती. त्यांना बुधवारी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांच्या दालनाच्या बाजूला असलेल्या जागेत नवे कार्यालय देण्यात आले आहे. नव्या दालनाला त्यांच्या नावाची प्लेटही लावण्यात आली आहे.





नगरअभियंता पदावर मागील कित्येक वर्ष काम करीत असलेले संदीप कारंजे यांची नुकतीच अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली. त्याबाबतचा शासन आदेशाही निघाला. त्यानंतर त्यांनी आयुक्त शितल तेली-उगले यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पदभारही घेतला. पदभार घेतल्यानंतर कारंजे यांनी कामाला सुरूवात केली. तत्पुर्वी आयुक्त शितल तेली-उगले यांनी सर्व अधिकाऱ्यांचे नव्याने खातेवाटप केले. त्यात कारंजे यांच्याकडे पाणीपुरवठा व ड्रेनेज, विद्युत, नगरसचिव, विधी, प्राणी संग्रहालय, पशुवैद्यकीय विभाग देण्यात आले. बुधवारी त्यांच्या कार्यालय सजविण्यात आले. टेबल, खुर्च्या मांडण्यात आल्या. दिवाबत्तीची योग्य सोय करण्यात आली. शिवाय संगणकही बसविण्यात आले आहे. नगरअभियंता म्हणून यशस्वीपणे कार्यभार सांभाळलेले कारंजे हे आता अतिरिक्त आयुक्त पदाचा कार्यभार नव्या दालनातून सुरू करणार आहेत.

## विडी घरकुलात जॉबरची आत्महत्या

✔ **सोलापूर** : विडीघरकुल परिसरातील युनिक टाऊन येथे राहणाऱ्या एका ६० वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. नामदेव बुचय्या कैरमकोंडा (वय ६०) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. त्याचा मृतदेह सकाळी ७ वाजेच्या सुमारास त्याच्या खोलीतील खिडकीच्या लोखंडी अँगलला लुंगीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत नामदेव हा कारखान्यात जॉबरचे काम करीत होता.त्याच्या पश्चात दोन पत्नी, तीन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## कवठेत गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : कवठे (ता.उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या एका ४२ वर्षीय विवाहित इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. चांदसाहेब इस्माईल शेख (वय ४२ रा. कवठे) असे मयताचे नाव आहे. तो काल सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास कवठे येथील नूर महंम्मद शेख यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून जैनुद्दीन (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## सकल जैन समाज वधू-वर पालक परिचय मेळावा उत्साहात

✔ सुराज्य/सोलापूर

जैन समाज हा अल्पसंख्यांक असून, एकूण लोकसंख्येच्या फक्त ३ टक्के आहे, आणि तो ही विखुरलेला आहे. तेव्हा असे वधु वर पालक मेळावे हे खूप मोलाची भूमिका बजावतात. अशा पद्धतीने वधू वर मेळावे होणे ही काळाची गरज आहे. नेमकी हीच काळाची गरज ओळखून, आर्यनंदी परिवाराने विधायक कार्य हाती घेतले आहे, असे गौरवोद्गार जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांनी काढले.

आर्यनंदी परिवार संचलित व आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन आयोजित, शुभमंगल सकल जैन समाज वधू-वर पालक परिचय मेळावा हुतात्मा स्मृती मंदिर, पार्क चौक, सोलापूर, येथे अतिशय भव्य- दिव्य पद्धतीने पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

मेळाव्यास सोलापूरच्या जी.एस.टी. कर निरीक्षक, वृषाली विशाल मेहता, बि. के. इंटरप्राईजेस च्या माधुरी पाटील, देव रोडवेजचे सुधीर पंडित, सन्मती सेवा दलचे मिहीरभाई गांधी, नाकोडा ग्रुपचे बाबुभाई मेहता, सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या ॲड. निता मंकणी, सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सिद्धांत गांधी हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

आर्यनंदी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना म्हणाले की, राज्यातील विविध भागातून आलेले उमेदवार व त्यांचे पालक या कार्यक्रमास उपस्थित राहून, एकाच छताखाली अनेक वधू वर उमेदवार स्थळांची माहिती, माफक दरामध्ये उपलब्ध करून देणे, जेणेकरून सर्वसामान्यांच्या वेळेची व पैशाची बचत व्हावी, हाच या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे सांगितले. तसेच आर्यनंदी परिवारातर्फे चालविण्यात येणाऱ्या आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था, आर्यनंदी निधी कंपनी, आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन, आर्यनंदी सांस्कृतिक प्रतिष्ठान व आर्यनंदी मासिक या वेगवेगळ्या कार्यरत शाखांची माहिती दिली.




यावेळी शुभमंगल सकल जैन समाज वधु वर पालक परिचय पुस्तिका २०२२ तसेच नूतन वर्ष २०२३ च्या आर्यनंदी दिनदर्शिकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. मेळाव्यास उपस्थित मान्यवरांपैकी वृषाली मेहता, बाबुभाई मेहता, सुधीरजी पंडित, मिहीरभाई गांधी, सागर शहा यांची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली नातू यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे तज्ञ संचालक प्रा. प्रेमचंद मेने यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये ३३५ वधू वर व त्यांचे पालक उपस्थित होते. मेळाव्यासाठी सचिव व संस्थेचे संचालक बाहुबली दुरूगकर, संचालक निलेश एखंडे, तज्ञ संचालक प्रा. प्रेमचंद मेने, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव आहेरकर यांनी परिश्रम घेतले.

# श्रमजीवींचे उत्पन्न कागदोपत्री आणण्यासाठी धोरण ठरविण्याची गरज : परदेशी

- आर.एस.एम. नेस्ट डेव्हलपर्सचा प्रकल्प गुणवत्तापुर्ण आणि गतीमान पध्दतीने पुर्णत्वास
- कागदोपत्री उत्पन्न नसलेल्या आर्थिक दुर्बलांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज : मिरगणे
- श्रमजीवींबाबतच्या मिरगणे यांच्या कल्याणकारी प्रस्तावास परदेशी यांचा सकारात्मक प्रतिसाद
- आर.एस.एम. नेस्टच्या प्रधानमंत्री आवास योजनेतील गृहप्रकल्पास राष्ट्रीय क्षमता वर्धन आयोगाचे संचालक परदेशी यांची भेट

✔ सुराज्य/बार्शी

कागदोपत्री उत्पन्न नसलेल्या परंतु प्रत्यक्षात उत्पन्न असलेल्या आर्थिक दुर्बलांना घरकुले घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत धोरण ठरविण्याची गरज असून आर.एस.एम. नेस्ट डेव्हलपर्सने प्रधानमंत्री आवास योजनेतील गृहप्रकल्पाचे बांधकाम गुणवत्तापुर्ण केले असून गतीमान पध्दतीने कमी वेळेत पुर्णत्वास नेले आहे असे गौरवोद्गार राष्ट्रीय क्षमता वर्धन आयोगाचे सदस्य प्रविणसिंह परदेशी यांनी काढले.




येथील आर.एस.एम. नेस्ट डेव्हलपर्सच्या प्रधानमंत्री आवास योजनेतील गृहप्रकल्पास दिलेल्या सदिच्छा भेटीत मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे, शिक्षण संस्था चालक अरूण बारबोले, उद्योगपती दिलीप खटोड, आर.एस.एम. नेस्ट डेव्हलपर्सचे भागीदार प्रितम मुरूडकर, पियुष बोंगिरवार आदी उपस्थित होते. यावेळी परदेशी म्हणाले देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना सचिवालयाचा कार्यभार सांभाळताना राजेंद्र मिरगणे हे गरिबांसाठी घरांच्या विविध योजना मांडत होते. त्यांनतर स्थापन झालेल्या महाहौसिंगच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना, म्हाडा, राज्यशासनाच्या विविध गृह योजना मिरगणे यांनी चांगल्या प्रकारे मार्गी लावल्या. मिरगणे यांनी कागदोपत्री उत्पन्न नसलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व्यक्तिंना घरे घेण्यासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत केलेली मागणी योग्य आहे. याबाबत धोरण ठरविण्याची गरज आहे. आर.एस.एम. नेस्ट डेव्हलपर्सचा गृहप्रकल्प गुणवत्तापुर्ण रितीने गतीमान पद्धतीने कमी वेळात पुर्णत्वास जात आहे याबद्दल परदेशी यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी परदेशी यांचा मिरगणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मिरगणे यांनी आर. एस.एम. नेस्ट डेव्हलपर्स या गृहप्रकल्पातील निम्मी घरे ७ लक्ष ५० हजार व उर्वरित ८ लक्ष ५० हजार रूपयात पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून दिली. त्यापैकी ४ लक्ष ५० हजार रूपये आवास योजना, बांधकाम कामगार, राज्य व केंद्र शासनाचे अनुदानातून लाभार्थ्यांना मिळवुन दिले जाते. उर्वरित रक्कमेचे कर्ज सदर आर्थिक दुर्बलांना मिळणे गरजेचे असून ते फेडण्याची त्यांची क्षमता असते मात्र बॅलन्स शिट व इनकम टॅक्स रिटन विषयक कागदपत्रे नसल्याने त्यांना राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्ज मिळण्यात अडचणी येते. आर्थिक सक्षमांना १ कोटी पर्यंतचे कर्ज ८ टक्के पेक्षा कमी व्याज दराने उपलब्ध करून दिले जाते मात्र हे कमी व्याजदर आर्थिक दुर्बलांना लागु होवुन त्यांना कर्ज मिळण्याची गरज आहे. कारण खाजगी पतसंस्था व वित्त पुरवठा संस्था व खाजगी सावकार या गरजुंना १५ ते १८ % पर्यंत व्याज आकारतात त्यामुळे सोलापुरातील रे नगरच्या धर्तीवर बार्शीतील लाभार्थ्यांनाही कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज असून याबाबत राष्ट्रीय पातळीवर धोरण ठरविण्याची गरज आहे अशी अपेक्षा मिरगणे यांनी परदेशी यांच्याकडे व्यक्त केली. तसेच बार्शी शहरात विविध योजनाअंतर्गत सुमारे पाच हजार घरांना मंजुरी मिळाली आहे.

परदेशी यांच्याकडे मुख्यमंत्र्याचे सचिवालय कार्यभार असताना त्यांनी बार्शी तालुक्याला विविध विकास योजनांसाठी निधी मिळवुन दिला. हा निधी मंजुर होण्यामागे परदेशीच पडद्यामागचे सुत्रधार होते. परदेशी यांचा किल्लारी येथील भुकंप पुर्नवसन कार्याचा व्यापक अनुभव व उत्कृष्ठ प्रशासकीय कारकिंदीमुळेच त्यांना प्रधानमंत्री मोदी यांनी राष्ट्रीय क्षमता वर्धन आयोगाच्या माध्यमातून काम करण्यासाठी संधी दिली आहे.

यावेळी माजी नगरसेवक राजाभाऊ काकडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी भाजपाचे माजी शहराध्यक्ष अश्विन गाढवे, अविनाश शिंदे, शिरीष घळके, बाजार समितीचे संचालक कुणाल घोलप, शरिफ शेख, जहाँगीर शेख, संभाजी सोनवणे, चन्नाप्पा चौगुले, अतिष बिसेन, मोहन गर्जे, प्रतिभा मुळीक आदी उपस्थित होते.




## डॉ. आय. जे. तांबोळी यांचे 'सिंहगड'मध्ये व्याख्यान

✔ **सुराज्य/सोलापूर :** केगांव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त प्रा. डॉ. आय.जे. तांबोळी, प्राचार्य सोलापूर सोशल महाविद्यालय यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रविंद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. आय. जे. तांबोळी यांनी अल्पसंख्यांकाचे प्रकार तसेच त्यांना मिळणाऱ्या विविध शैक्षणिक सवलती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व यावेळी त्यांनी भाषिक, धर्म, जाती आणि वर्ण याबाबतीत अल्पसंख्यांक असलेल्या व्यक्तींच्या विशेषाधिकारांची उन्नती करणे आणि त्यांचे संरक्षण करणे, हे या दिवसाचे उद्दिष्ट आहे व हा दिवस अल्पसंख्याकांशी निगडित मुद्द्यांविषयी आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल अधिक चांगल्याप्रकारे समजून घेण्यासाठी आणि लोकांना शिक्षित करण्यावर केंद्रित असतो. अशा प्रकारे त्यांनी या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थी व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




## स्टेट बँक ऑफ इंडियाकडून विमाधारकांच्या वारसांना धनादेश वाटप

✔ **सुराज्य/दक्षिण सोलापूर :** प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना किंवा बँकेचा विमा उतरवून आपल्या कुटुंबाच्या भविष्याची तरतूद करावी, असे आवाहन स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय मुख्य सरव्यवस्थापक माहेश्वरी प्रसाद यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्यावतीने अपघाती व नैसर्गिक मृत्यू झालेल्या खातेदारांच्या वारसांना बुधवारी भंडारकवठे स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय मुख्य सरव्यवस्थापक माहेश्वरी प्रसाद यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप करण्यात आले.

यावेळी क्षेत्र प्रबंधक राजीव गुप्ता, सरपंच चिदानंद कोटगोंडे, बाजार समिती संचालक वसंत पाटील, माजी पंचायत समिती सदस्य विठ्ठल पाटील, शिवानंद हाताळे, निंबण्णा जंगलगी, गुरुनाथ आरकेरी व खातेदार उपस्थित होते. यावेळी शाखा व्यवस्थापक अनिल नारायणकर यांनी स्वागत केले. यावेळी अपघाती मृत्यू झालेले बाळगींचे काशिनाथ कस्तुरे यांच्या वारस शारदा कस्तुरे यांना दहा लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच माहेश्वरी कमळे यांच्या वारसांना दोन लाख रुपये व शशिकला लायणे यांचे वारसदार शिवगोंडा लायणे यांना चार लाख रुपयाचा धनादेश देण्यात आला. तसेच प्रदिप कुंभार, सिध्दाराम पुजारी कर्मचारी वृंद उपस्थित होते तर श्रीनिवास कोडम यांनी आभार मानले.

# रसायनमिश्रित पाणी नाल्यात सोडल्याप्रकरणी कारवाई करा

### माजी नगरसेवकांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

✔ **सुराज्य/सोलापूर**

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीच्या कारखान्यामधून रसायनमिश्रित दुर्गंधीयुक्त दूषित पाणी नाल्यात सोडण्यात येत आहे. विडी घरकुल परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोणत्या कारखान्यातून हे दूषित पाणी सोडण्यात येते याची माहिती घेण्यात यावी आणि संबंधित कारखान्याविरोधात कारवाई करावी, या मागणीचे निवेदन बुधवारी माजी नगरसेवक प्रथमेश कोठे व विठ्ठल कोटा यांनी महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना दिले.



गेल्या वर्षी अक्कलकोट रोड मुद्रा सन सिटी समोरील चेंबरमध्ये काम करीत असताना चार निष्पाप कर्मचाऱ्यांचा याच केमिकलच्या पाण्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता. तरी पण महापालिकेकडून कुठल्याहीप्रकारे कायदेशीर कारवाई केली नाही.

तरी आयुक्तांनी कार्यवाही करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेवक प्रथमेश कोठे व विठ्ठल कोटा यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### प्रदूषण नियंत्रण महामंडळास कारवाई करण्याचे पत्र देणार : आयुक्त

एमआयडीसी कारखान्यातून हे दूषित पाणी नाल्यात सोडण्यात आले आहे. हा विषय महापालिकेच्या अखत्यारित येत नाही तर तो प्रदूषण नियंत्रण मंडळ अंतर्गत येतो. महापालिकेच्या अंतर्गत सेव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) हा विषय येतो तर इन्फ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (ईटीपी) हा विषय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे येतो. दूषित पाण्यासंदर्भातील विषय हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचा आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नासंदर्भातील मुद्दा व महापालिकेकडे आलेल्या तक्रारींचा विचार करता महापालिकेकडून प्रदूषण नियंत्रण मंडळ व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना संबंधित कारखान्यांवर आवश्यक ती कारवाई करावी, याबाबत पत्र देणार असल्याचे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले.

## कोन्हाळी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत श्री मल्लिकार्जुन व रेणुका यल्लमा देवी पॅनलचे वर्चस्व



✔ **सुराज्य/अक्कलकोट**

**अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत श्री मल्लिकार्जुन व रेणूका यल्लम्मा देवी ग्रामविकास पॅनलने घवघवीत यश संपादन करीत ग्रामपंचायतीवर वर्चस्व सिध्द केले आहे.**

या निवडणुकीत श्री स्वामी समर्थ, श्री मल्लिकार्जुन व यल्लम्मा देवी ग्रामविकास पॅनल तसेच विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रामविकास पॅनल व अपक्ष उमेदवार मंगल लालबा जाधव आदी पॅनल व अपक्ष उमेदवार यांनी गावपातळीवर जोरदार प्रचार यंत्रणा राबवित निवडणुकीत चुरस निर्माण केली होती. या ग्रामपंचायत सरपंच पदासाठी चार उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. श्री मल्लिकार्जुन व रेणूका यल्लमा देवी ग्रामविकास पॅनलकडून चिदानंद सिध्दण्णा उण्णद, श्री स्वामी समर्थ श्री मल्लिकार्जुन व यल्लम्मा देवी ग्रामविकास पॅनलकडून प्रियांका अंबरीश ढब्बे, विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रामविकास पॅनलकडून विठ्ठल रामचंद्र जाधव तर अपक्ष म्हणून मंगल लालबा जाधव हे चार सरपंच उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब अजमावत होते.

शेवटी या ग्रामपंचायत निवडणुकीत श्री मल्लिकार्जुन व रेणूका यल्लम्मा देवी ग्रामविकास पॅनलने घवघवीत यश संपादन करीत ग्रामपंचायतीवर वर्चस्व सिध्द केले आहे. या निवडणुकीत मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार याची उत्सुकता सर्वांनच लागली होती. एका बाजूला नव्याने निवडणूक रिंगणात उतरलेले युवकांची फळी तर दुसरीकडे आजी-माजी मातब्बर नेत्यांची एकवटलेली ताकद पहायला मिळाली होती. सध्या तीनही पॅनल प्रमुख व अपक्ष सरपंच उमेदवार हे आपणच विजयाचे दावेदार असल्याचे बोलले जात होते.

शेवटी सरपंच उमेदवार म्हणून चिदानंद सिध्दण्णा उण्णद हे विरोधकांना चारी मुंडी चित करत घवघवीत यश संपादन करीत विजयी संपादन केले आहे. थेट जनतेतून सरपंच निवडला जाणार असल्याने अपक्ष उमेदवारालाही या निवडणुकीत अधिक महत्व प्राप्त झाले होते. तीन ही पॅनलचे उमेदवार, कार्यकर्ते व अपक्ष उमदेवार निवडणुकीत जोरदार प्रचार यंत्रणा राबविला होता. प्रत्येकांनी आपआपले मत जनतेपुढे मांडण्याचा प्रयत्न करत होते. परंतु जनता मात्र श्री मल्लिकार्जुन व रेणूका यल्लमा देवी ग्रामविकास पॅनलला भरभरुन प्रतिसाद दिला आहे.

## सहा महिन्यानंतर अखेर भूमकर न्यायालयास शरण

### चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी

✔ **सुराज्य/वैराग**

सहा महिन्यांपूर्वी वैरागमध्ये दोन गटात झालेल्या हाणामारीच्या गुन्ह्यामध्ये संशयित आरोपी असलेले वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर आणि त्यांचा सहकारी सुहास सावंत हे अखेर न्यायालयास शरण आले असून त्यांना न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



लाडोळे तळ्यातील मत्स्य व्यवसायाच्या ठेक्यावरुन सुहास सावंत आणि अनिल जिरंगे यांच्यामध्ये वाद होता. दरम्यान १२ जून रोजी रागाने बघण्या वरून हा वाद पुन्हा उफाळून आला. हे प्रकरण मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते व वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांच्या निवासस्थानासमोर दोन्ही गटाचे लोक जमले होते. दरम्यान, यावेळी झालेल्या वादावादीतून दोन्ही गटात मारहाण केली. यात दोन्ही गटाचे पाच जण जखमी झाले. त्यानंतर मारुती जिरंगे, अनिल जिरंगे, शुभम जिरंगे, अक्षय जिरंगे, प्रदीप उर्फ छोटू मारुती जिरंगे, राजू बायस, गणेश नंदकुमार देशमुखे आणि समीर हसम्मुद्दीन शेख यांच्यासह वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, किशोर नंदकुमार सावंत, सुहास सर्जेराव सावंत, ऋतुराज संतोष पवार, युवराज प्रकाश प्रबळकर, फैय्याज इब्राहिम अन्सर, नागेश उमेश शिंदे, गणेश चंद्रकांत काटमोरे अशा दोन्ही गटाच्या सोळा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर या घटनेतील सर्व संशयित आरोपी अटक करण्यात आले. मात्र, वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन प्रकाश भूमकर आणि सुहास सर्जेराव सावंत हे फरार झाले. तपास अधिकारी सपोनी महारुद्र परजणे यांनी पोलिसांनी १२ सप्टेंबरपर्यंत चार्जशिट देखील दाखल केले. या घटनेनंतर फरार झालेल्या संशयित आरोपींनी शेषण कोर्टामध्ये दोन वेळा जामिनासाठी अर्ज ठेवला होता. मात्र, दोन्हीही वेळा तो फेटाळण्यात आला. त्यानंतर हाय कोर्टात ही देखील दोन वेळा जामिनासाठी अर्ज ठेवण्यात आला होता. मात्र, तोही फेटाळण्यात आला. त्यानंतर उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर आणि सुहास सावंत हे दोघेही फरार बार्शीच्या प्रथमवर्ग न्यायालयासमोर मंगळवारी शरण आले. न्यायालयात हजर होताच त्यांना न्यायाधिशांनी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

महावितरण बार्शी संवसु विभागा अंतर्गत चालू आर्थिक वर्षाकरिता उपकेंद्रामधील व लाईनवरील नादुरुस्त व बंद स्थितीत असलेले Capacitor Bank दुरुस्तीसाठी तसेच बदलण्यासाठी, इत्यादी कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. **निविदा क्रमांक ईई/बीआरएस/टी-१०/२२-२३** (निविदेची रक्कम ५ लाख) आणि निविदा भरण्याची सुरुवात **दि. २२.१२.२०२२ सकाळी १0:00 व अंतिम तारीख २७.१२.२०२२, १४:00** वाजेपर्यंत आहे. निविदा तपशील व डाऊनलोड करण्यासाठी कृपया आमच्या वेबसाईट **https://etender.mahadiscom.in/eatapp** वर भेट द्या. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे/नाकारणे व रद्द करणे यासाठी सर्व हक्क राखून ठेवले आहेत. कृपया नोंद घ्या.

संपर्क क्र. ७८७५७६८२७२
**PRO/BMTZ/१४५/२०२२-२३**

**कार्यकारी अभियंता,**
**महावितरण, बार्शी विभाग.**

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name Mrs.MADHUBALA PRAVINCHANDRA PANCHAMIYA has been changed to New Name **Mrs.MADHUBALA PRAVINKUMAR PANCHAMIYA** and residing AT-7/A,Sahyadri Housing Society, Near Vikas Nagar Civil Lines ,Solapur. Dist.SOLAPUR-413003. Kindly Note The Same

# जिल्ह्यात जैन समाजाचा मोर्चा





✔ **सुराज्य/पंढरपूर:** सम्मेद शिखरजी हे क्षेत्र पवित्र स्थळाऐवजी 'पर्यटन स्थळ' म्हणून घोषित केले गेले आहे. त्याचा निषेध करण्यासाठी बुधवार जैन समाजाने ठिकठिकाणी बंद पाळून निषेध मोर्चे काढले.

सकल जैन समाज पंढरपूर तालुका, शहर यांच्यावतीने निषेध मोर्च्याचे येथे आयोजन करण्यात आले. झारखंड सरकारने सम्मेद शिखरजी या जैन तीर्थक्षेत्राला पर्यटन स्थळ म्हणून जाहीर केले आहे. याचा निषेध करण्यासाठी फडे दिगंबर जैन मंदिर येथून निषेध काढण्यात आला.

पंढरपूर तहसील कार्यालयात उपजिल्हाधिकारी समाधान भटुकडे यांना जैन समाजाच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर महाद्वार , पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर महावीर नगर, श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर वीरसागरनगर, त्रिलोक तीर्थक्षेत्र शेगाव दुमालाचे पदाधिकारी, पद्मावती महिला मंडळ, सुमन श्री महिला मंडळ यांच्यासह विविध मंडळ, जैन सोशल ग्रुप, सन्मती सेवा दल, महावीर युवा सेना, जैन चॅरिटेबल ट्रस्ट, जैन युवा फेडरेशन,जैनवाडी, देगाव, पेनूर, पाटकूल, करकंब, कौठाळी, सरकोली येथील जैन बांधव उपस्थित होते.

**बार्शीत मोर्चा**

✔ **सुराज्य/बार्शी** झारखंड राज्यातील परसनाथ पहाडावर श्री संमेदशिखरजी तीर्थ असतानाही ते ठिकाण मुक्त अभयारण्य पर्यटन घोषित केल्याच्या निषेधार्थ व हा अद्यादेश रद्द करण्याच्या मागणीसाठी बार्शीतील सकल जैन समाज बांधवांनी मोर्चा काढला. तसेच बार्शी बंदची हाक दिली. या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

हा मोर्चा शहरातील सोमवार पेठ येथील श्री वर्धमान जैन स्थानकवासी संघा समोरून तहसिल कार्यालयावर नेण्यात आला. या मोर्चाची सांगता झाल्यानंतर तहसिलदार सुनिल शेरखाने यांना निवेदन देण्यात आले. या मोर्चामध्ये वर्धमान जैन स्थानक संघाचे पारसमल कांकरिया, महावीर सेवा संघाचे सुभाष लोढा, जैन श्वेतांबर ऋषभदेव मंदिर ट्रस्टचे प्रदीप बागमार, दिगंबर शेतवाल ट्रस्टचे अनिरूध्द अन्नदाते यांच्यासह जैन समाज बांधव व महिला सहभागी झाले होते.



**अक्कलकोट समस्त जैन समाज**

✔ **सुराज्य/अक्कलकोट:** जैन धर्मियांचे झारखंड येथील पवित्र तीर्थक्षेत्र मधुबन हे पर्यटन क्षेत्र घोषित करण्यात आल्याने त्याचा विरोध म्हणून समस्त जैन समाजाच्यावतीने मूक मोर्चा काढून तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांना निवेदन देण्यात आले. जैन धर्म समाज बांधवांनी थोरल्या जैन मंदिरापासून मूक मोर्चा काढला जैन धर्मियांनी त्यांचे सर्व व्यवहार बंद ठेवून झारखंड सरकारच्या या निर्णयाचा निषेध नोंदविला शहराच्या प्रमुख मार्गावरून बाजारपेठेतून समर्थ चौक, सोन्या मारुती चौक, सावरकर चौक, कारंजा चौक, एवन चौक, कमला राजे चौक मार्गे जुना तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात आले.

या मोर्चामध्ये अभय खोबरे, राजेंद्र शहा, प्रवीण शहा, ॲड. प्रशांत शहा, ॲड. हर्षवर्धन एखंडे, डॉ. संतोष मेहता, अशोक येणगुरे, स्वप्निल शहा, विराग दोशी, संदेश शहा, रोहित खोबरे, डॉ. विपुल शहा, निनाद शहा, सुरज आळंद, सौरभ शहा, अनिल खोबरे, स्वप्निल आळंद, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वप्ना शहा, माधुरी शहा, विद्या विभुते माधुरी आळंद यांच्यासह शहर आणि ग्रामीण भागातील शेकडो जैनबांधव महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. दरम्यान, अक्कलकोट व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे उपाध्यक्ष प्रसन्न हत्ते यांनीही शहरातील समस्त व्यापाऱ्यांच्या वतीने या मूक मोर्चाला पाठिंबा देऊन ते देखील मोर्चामध्ये सहभागी झाले होते. जैन बांधवांनी आपापले उद्योग बंद ठेवून झारखंड सरकारच्या निर्णयाचा निषेध नोंदविला.

**सकल जैन समाज, वेळापूर**

✔ **सुराज्य/वेळापूर:** जैन समाजातील प्रत्येक व्यक्ती आयुष्यात एकदा तरी श्री सम्मेद शिखरजी येथे जाऊन २० तीर्थंकर पवित्र मोक्ष भूमीवर पहाड़ वंदना अनवाणी करण्याची इच्छा बाळगतो. परंतु सरकारच्या सदर निर्णयामुळे जैन समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पवित्र भूमीचे पावित्र्य धोक्यात आले असून जैन समाजाच्या अस्मितेवर घाला घालायचा हा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे देशभरातील सकल जैन समाजामध्ये संतापाची लाट उसळली असून देशभरात सर्व स्तरातून या निर्णयाचा निषेध केला जात आहे. वेळापूर शहर व परिसरामधील विविध सकल जैन मंदिर ट्रस्ट, संघटना, युवक व महिला मंडळ सरकारच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त करत आहे अशा आशयाचे निवेदन वेळापूर येथे पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि निलेश बागाव यांना देण्यात आले.

यावेळी विरकुमार दोशी, प्रेम दोशी, शुभम दोशी, प्रतीक दोशी, महाविर दोशी, अरिंजय गांधी, उमेश फडे, सुशांत दोशी, विजयकुमार दोशी, संदीप दोशी, प्रवीण शहा, रुपेश दोशी यांच्यासह सकल जैन समाज बांधव उपस्थित होते.

**कुर्डूवाडी सकल जैन समाज**

✔ **सुराज्य/कुर्डूवाडी:** कुर्डूवाडी शहरातील सकल जैन समजाकडून जैन धर्माचे तीर्थक्षेत्र पर्यटन स्थळ जाहीर केल्यामुळे बुधवारी छ. शिवाजी महाराज चौक येथून निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी शहरातील सकल जैन समाजाने आपले दुकाने बंद ठेवली होती. यावेळी मोर्चाद्वारे निवेदन उपविभागीय अधिकारी ज्योती कदम यांना देण्यात आले. भारतीय जैन संघटना, भारतीय जैन महिला संघटना, सन्मती सेवा दल, सन्मती महिला मंडळ, वर्धमान जैन मंडळ, आनंतनाथ दिगंबर जैन ट्रस्ट, मुनिसुरात देरासर जैन ट्रस्ट, चंदनबाला महिला मंडळ, महावीर मंडळ, सुशील बहु मंडळ, गुरु गणेश ग्यान भंडार, सकल जैन समाज कपिलापुरी, माढा, मुंगशी या संस्थांनी यावेळी निषेध निवेदन सुपूर्द केली.

**जाहीर प्रसिंध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार खालील *ड* व *क* वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी तात्पुरती मतदार यादी प्रसिंध्द कार्यक्रमाची जाहीर प्रसिंध्दीकरण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | सस्था वर्ग | प्रारुप मतदार यादी प्रसिंध्द करण्याचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | प्राप्त आक्षेपावर निर्णय देण्याचा अंतिम दिनांक | अंतिम मतदार यादी प्रसिंध्द करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गंगोत्री मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था मर्या.अक्कलकोट | ड | २२/१२/२०२२ | २२/१२/२०२२ ते ३०/१२/२०२२ | ०९/०१/२०२३ | १०/०१/२०२३ |
| २ | आदर्श मजूर सहकारी संस्था मर्या.अक्कलकोट ता.अक्कलकोट | ड | | | | |
| ३ | गजराज मजूर सहकारी संस्था मर्या.हंद्राळ ता.अक्कलकोट | ड | | | | |
| ४ | अक्कलकोट मजूर सहकारी संस्था मर्या.अक्कलकोट | ड | | | | |
| ५ | रेणूका नगर मागासवर्गीय मजूर सहकारी मर्या. काझीकणबस | ड | | | | |
| ६ | राहूल मजूर सहकारी संस्था मर्या.अक्कलकोट | ड | | | | |
| ८ | संतोष मजूर सहकारी संस्था मर्या.अक्कलकोट | ड | | | | |
| ९ | सेवालाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था कडबगांव | ड | | | | |
| १० | महात्मा हातमाग विणकर सहकारी उत्पादक संघ नि.मैदर्गी ता.अक्कलकोट | ड | | | | |
| ११ | करजगी विणकर उत्पादक सहकारी सोसायटी निय.करजगी ता.अक्कलकोट | ड | | | | |
| १२ | नवभारत हातमाग विणकर सहकारी उत्पादक संघ लि.मैदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर | ड | | | | |
| १३ | तोळणूर विणकर उत्पादक सहकारी सोसायटी लि.तोळणूर ता.अक्कलकोट | ड | | | | |
| १४ | श्री.बसव ग्रामि ण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.करजगी | क | २२/१२/२०२२ | २२/१२/२०२२ ते ३०/१२/२०२२ | ०९/०१/२०२३ | ०९/०१/२०२३ |
| १५ | अक्कलकोट तालुका हत्तीरोग सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.अक्कलकोट ता.अक्कलकोट | क | | | | |
| १६ | सोनिया महिला ग्राहक सहकारी संस्था मर्या.मैदर्गी ता.अक्कलकोट | क | | | | |

संस्थेची सविस्तर प्रारुप मतदार यादी व आदेश संस्थेच्या नोटीस बोर्डावर, तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,अक्कलकोट यांचे कार्यालय,स्वामी समर्थ सहकारी बँक मर्या.(अवसायनात) अक्कलकोट ए-वन चौक, स्टेशन रोड, अक्कलकोट येथील नोटीस बोर्डावर प्रसिंध्द करण्यात आलेला आहे.

सही/-
(एस.जे.दडस)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा- सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,अक्कलकोट

# कुरुल-पंढरपूर रस्त्याचा प्रश्न पोहचला संसदेत

## खा.धनंजय महाडिक यांनी केंद्राकडे वर्ग करण्यासाठी उपस्थित केला प्रश्न

सुराज्य/विरवडे

**कुरुल (ता.पंढरपूर) या ३६ किलोमीटर राज्य महामार्गाची गेल्या अनेक वर्षापासून दुरावस्था आहे. तालुक्यातील सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा रस्ता व्हावा यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठविला. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना रक्ताने पत्र लिहिले. रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये रक्तदान आंदोलन घेतले. तरीही तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने कोणतीच दखल घेतली नाही. मात्र धनंजय महाडिक हे राज्यसभेचे खासदार होताच त्यांनी सध्याच्या युती सरकारकडून रस्त्याच्या डागडुजीसाठी २० कोटी रुपये मंजूर करून घेतले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी आज संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी उपस्थित करत कुरुल-पंढरपूर रस्ता केंद्राकडे वर्ग करण्याची मागणी केली.**

संसदेच्या या हिवाळी अधिवेशनात बोलताना खा. महाडिक म्हणाले की, कुरुल-पंढरपूर हा महामार्ग महाबळेश्वर, सातारा, पंढरपूर, सोलापूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर या प्रमुख पर्यटन स्थळ आणि धार्मिक स्थळांना जोडणारा आहे. शिवाय हा महामार्ग पंढरपूर सारख्या धार्मिक स्थळाकडे जातो. श्रीक्षेत्र विठ्ठलाच्या आषाढी, कार्तिकी, माघ, चैत्र या चार महत्त्वाच्या आणि मोठ्या एकादशीच्या मोठ्या यात्रा भरतात. त्यामुळे या महामार्गावरून अनेक दिंड्या जातात, हजारो



भाविक पायी चालत जातात. हा महामार्ग मुंबई-पुणे-विजापूर या राष्ट्रीय महामार्गाला जोडला आहे. शिवाय राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी सोलापूर या महामार्गाला देखील हा मार्ग जोडलेला आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रस्त्याच्या आसपास १५ साखर कारखाने असून कारखान्यांची ऊस आणि साखर वाहतूक याच मार्गावरून होते.

त्यामुळे कुरुल पंढरपूर हा महामार्ग सातारा-पंढरपूर-कुरुल-कामती हा महामार्ग सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ मध्ये समाविष्ट करावी अशी विनंती त्यांनी सभागृहाला केली.

### रक्त वाया जाणार नाही ही खात्री

कुरुल पंढरपूर रस्ता व्हावा यासाठी दोन्ही तालुक्यातील प्रतिनिधी मूग घेऊन गप्प होते. त्यामुळे मी व नागटिळक वकील तसेच अनेक संघटनानी सातत्याने पाठपुरावा केला. रक्ताने पत्र लिहिले. रक्तदान आंदोलन केले. मात्र तत्कालीन राज्य शासन व विद्यमान लोकप्रतिनिधी यांनी कोणतीच दखल घेतली नाही. मात्र आता खा. धनंजय महाडिक यांनी हा प्रश्न हाती घेतला आहे. परवा राज्य शासनाकडून २० कोटी मंजूर करून घेतले. आज संसदेत आवाज उठविला आहे. त्यामुळे आम्ही आंदोलन केलेले रक्त वाया जाणार नाही ही शास्वती खासदार महाडिक यांच्यामुळेच वाटते.

**- सुहास घोडके, आंदोलनकर्ता तथा सामाजिक कार्यकर्ता)**

### ... तोपर्यंत पाठपुरावा सुरू राहील

- कुरुल पंढरपूर रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या रस्त्यावरून प्रवास करणारा वाटसरू अत्यंत घायकूतीला आला आहे. रस्ता व्हावा यासाठी वेगवेगळी आंदोलने झाली. मात्र राज्याच्या तत्कालीन सरकारने कसलीच दखल घेतली नाही. जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा मला जनतेचे प्रश्न संसदेच्या सभागृहात मांडण्याची संधी मिळाली. पूर्वी फक्त कोल्हापूरचे आणि सर्वसमावेशक प्रश्न असायचे. आता कोणतेही भागातील प्रश्न मांडण्याची संधी आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू राहील. शिवाय करून पंढरपूर रस्ता जोपर्यंत पूर्णत्वास जात नाही त्याचे नूतनीकरण होत नाही तोपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील.

**- खा. धनंजय महाडिक**

---



## युवती महोत्सवात सेवासदनची बाजी

**सोलापूर** : पुणे सेवासदन शाखा सोलापूरच्या शतक महोत्सवानिमित्त आयोजित सेवासदन कला कौमुदी युवती महोत्सवात सेवासदन शताब्दी विशेष चषकावर डी.एच.बी. सोनी कनिष्ठ महाविद्यालयाने आपले नाव कोरले. तसेच सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या डॉ. वैशाली कडूकर यांच्या हस्ते विजेत्यांना मंगळवारी पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा वीणा पतकी, माजी प्राचार्या वंदन जोशी, परीक्षेत मनीषा जोशी, ऋषिकेश पागे, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, संजीवनी नगरकर, संगीता आपटे, महोत्सवाच्या कार्याध्यक्षा प्रा. वैशाली नगरकर, विद्यार्थीनी प्रतिनिधी ऋचा साळुंखे उपस्थित होते. युवती महोत्सवाचे उद्घाटन हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. युवती महोत्सवात समूहनृत्य स्पर्धा आणि डॉजबॉल स्पर्धा घेण्यात आल्या. यात शहरातील १६ कनिष्ठ महाविद्यालयातील २१ संघ सहभागी झाले होते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त देशभक्तीपर गीतांवर आधारित ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत समूहनृत्य प्रकारातून हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय आणि सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयास प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. तर द्वितीय क्रमांक छत्रपती शिवाजी महाराज कनिष्ठ महाविद्यालयाने मिळवला. तसेच डॉजबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाने तर द्वितीय क्रमांक डी. एच. बी. सोनी कनिष्ठ महाविद्यालयाने मिळवला. रोख रक्कम, चषक आणि सहभाग प्रमाणपत्र असे बक्षिसांचे स्वरूप होते.पर्यवेक्षक पद्मकुमार उपाध्ये यांनी प्रास्ताविक केले. सविता मादळे यांनी सूत्रसंचालन तर प्रा. वैशाली नगरकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## मोहोळ तहसील आवारात स्वच्छतागृह मोडकळीस

**विरवडे बु.** : प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटना मोहोळ तालुका यांच्याकडून मोहोळ तहसीलदार प्रशांत बेडसे यांना निवेदन देण्यात आले आहे या निवेदनात असे म्हटले आहे की मोहोळ तहसील आवारात , स्वच्छतागृह आहे ते मोडकळीस आले आहे त्यामुळे त्या स्वच्छतागृहाचा वापर करताना दिसून येत नाही स्वच्छतागृहाचा वापर होत नसल्यामुळे तहसील कार्यालयाच्या पाठीमागे घाणीचे साम्राज्य वाढत आहे त्यामुळे आपण त्वरित या तहसील कार्यालय मध्ये बंद पडलेले स्वच्छतागृह सुरू करावे अन्यथा२६-१२-२०२२रोजी संडासचे भांडे गिफ्ट देऊन आंदोलन करण्यात येईल असे निवेदन प्रहार जनशक्ती पक्ष शेतकरी संघटने कडून प्रशांत बेडसे यांना देण्यात आले आहे यावेळी तालुका अध्यक्ष वैभव जावळे संपर्कप्रमुख नानासाहेब खांडेकर कार्याध्यक्ष अनिल पाटील उपाध्यक्ष नानासाहेब ननवरे युवा उपाध्यक्ष भुतासिद्ध म्हमाने प्रसिद्धी प्रमुख विशाल मासाळ व प्रहार चे कार्यकर्ते उपस्थित होते

## माळीनगरच्या हर्षद राजूरकरची विभागीय स्तरावर निवड

**माळीनगर** : येथील गुलमोहर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी हर्षद विकास राजुरकर याची १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेसाठी विभागीय स्तरावर निवड झाली आहे.जिल्हास्तरीय स्पर्धा कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,पंढरपूर येथे पार पडल्या. १०० मीटर धावणे या स्पर्धेत हर्षदने १४ वर्षे वयोगटात जिल्ह्यात प्रथमक्रमांक पटकावला. क्रीडाशिक्षक बाळासाहेब चव्हाण यांनी त्यास मार्गदर्शन केले. दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र गिरमे, उपाध्यक्ष प्रकाश गिरमे, सचिव ॲड.सचिन बधे, खजिनदार नितीन इनामके व संचालक मंडळ,गुलमोहरच्या प्राचार्या सारंगा गिरमे यांनी हर्षदचे अभिनंदन केले.





## आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रिपाइंच्यावतीने शालेय साहित्य वाटप

**वेळापूर** : मळोली (ता. माळशिरस) येथे रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त मळोली जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. नामदार आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून राज्यभरात साजरा केला जातो त्याचाच एक भाग म्हणून मळोली येथे शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे होते. यावेळी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कारंडे, उपशिक्षक नानासाहेब जाधव, शिक्षीका श्रीमती नीता मोहिते, श्रीमती स्वाती कळसुली, श्रीमती रेश्मा खान, बाळासाहेब जाधव, शरद साबळे, आयोजक दत्तात्रय बनसोडे, मिलिंद गायकवाड, किरण मस्के, विजय सोहनी, श्रीकांत जाधव, अरविंद साठे, अनिल माने, आर के लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी मिलिंद सरतापे दत्तात्रय बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन रिपाइं आठवले शाखा मळोली यांच्या वतीने करण्यात आले होते.

## दुचाकीचा अपघात; जखमी महिलेचा मृत्यू

**सोलापूर** : मांजरगाव तालुका करमाळा येथे दुचाकीच्या अपघातात जखमी झालेल्या शारदाबाई गोरख गरदडे (वय ६५) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी मयत झाल्या.१६ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास त्या गावातील मोरेवस्ती येथून पायी निघाल्या होत्या. त्यावेळी पाठीमागून दुचाकी धडकल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. बार्शी येथे प्राथमिक उपचार करून त्यांना १८ डिसेंबर रोजी सोलापुरात रवी (मुलगा) यांनी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

## शिरवळ ग्रामपंचायतीवर तानवडे-बिराजदार गटाची सत्ता

### शिरवळमध्ये महिलाराज



**अक्कलकोट** : शिरवळ ग्रामपंचायतीची निवडणूक तशी एकतर्फी झाली. कारण या ठिकाणी भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे आणि भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अप्पासाहेब बिराजदार हे दोन्ही गट इतिहासात पहिल्यांदा एकत्र आले होते. त्यामुळे सरपंच पदाचे उमेदवार आशाबाई शरणबसप्पा बिराजदार यांचा विजय सोपा झाला.येथे तानवडे बिराजदार गटाची सत्ता आली. शिरवळ वर महिलाराज आली असून, सोलापूर जिल्ह्यात शिरवळ ग्रामपंचायतचा आदर्श अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ ग्रामपंचायत मध्ये सर्व ११ सदस्य महिला व सरपंच ही महिलाच भाजपचे तानवडे व बिराजदार एकवटले.

शिरवळ येथे सरपंच पदासाठी नामाप्र या जागेवर सरपंच म्हणून बिराजदार आशाबाई शरणबसप्पा (१३०३) मते घेऊन निवडून आले आहेत व इतर सर्व सदस्य व त्यांना कंसात मिळालेले मते - पठाण हमीदा दिलबाशा (३८१), पाताळे मलकव्वा चंद्रकांत (बिनविरोध),गायकवाड रूपाली उत्तम (४३२), निंबाळे कांताबाई चंद्रकांत (बिनवरोध), थोरात मंगलाबाई कृष्णात (बिनविरोध), पुजा चंद्रकांत कवडे (बिनविरोध), कोरे सत्यभामा गंगाधर (बिनविरोध), तानवडे निर्मला अशोक (बिनवरोध्), जोगधनकर मनिषा संजया (३९६), मानेपाटील शैलजा वंसत (बिनविरोध), दुधभाते मनिषा रमेश (बिनविरोध)

## भोसरे येथ दोन गटात हाणामारी; आठजणांवर गुन्हा

सुराज्य/कुर्डूवाडी

उसने पैसे परत मागण्याच्या कारणावरून वाद झाल्याने दोन गटात हाणामारी झाली. ही घटना दिनांक १७ रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. पोलीस ठाण्यात पोलीस नाईक नितीन गोरे यांनी फिर्याद दाखल केली आहे. भोसरे येथील ८ जणा विरूद्ध कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.हाकिकत पोलीस पेट्रोलिंग करीत असताना कुर्डूवाडीतील पंढरपूर चौकामध्ये आठ ते दहा जण एकमेकास मारहाण भांडण व मारहाण करत होते. मोठ्याने आवाज करींत असल्याचे ठिकाणी पोलीस गेले असताना या ठिकाणी दुचाकी वाहनाची मोडतोड झाल्याचे दिसून आले.

यावेळी पोलिसांनी हेमंत विजयकुमार बागल ,सचिन मधुकर बागल, अर्जुन भारत बागल, अक्षय सुनील बागल, नितीन भारत बागल, सचिन रामचंद्र बागल, आजिनाथ विश्वनाथ देशमुख, ज्ञानेश्वर उत्तम बागल सर्व रा. भोसरे ता. माढा यांच्या विरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## आजपासून 'शायनिंग महाराष्ट्र महाप्रदर्शना'चे आयोजन

- खा.रणजितसिंग नाईक निंबाळकर यांचा पुढाकार
- केंद्र सरकारच्या सर्व योजनांची माहिती एका छताखाली मिळणार

सुराज्य/वेळापूर

खा. रणजितसिंग नाईक निंबाळकर यांच्या पुढाकारातुन दि. २२,२३ व २४ डिसेंबर२०२२ या कालावधीत माळसिरस तालुक्यातील वेळापुर येथे ''शायनिंग महाराष्ट्र २०२२'' या भव्य महाप्रदर्शनाचे आयोजन केले असल्याची माहिती नवी दिल्लीच्या सांसा फाउंडेशनचे अध्यक्ष आनंद पाल आणि मनमोहन भास्कर यांनी दिली.



गुरुवार दि. २२ डिसेंबर रोजी माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात येणार असून यावेळी भाजपा नेते धैर्यशील मोहिते पाटील, पं.स.चे माजी सदस्य के. के. पाटील माजी जी. प. सदस्य ज्योती ताई पाटील, माळशिरसचे नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात केंद्र सरकरच्या सर्व योजनांची माहिती एकाच छताखाली मिळणार आहे. केंद्र सरकारच्या प्रचार आणि प्रसार योजनेतुन आयोजित केल्या जाणाऱ्या या महाप्रदशनात साठहुन अधिक स्टॉल असणार आहेत. यामध्ये केंद्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान, केंद्रीय जलशक्ति, झारखंड टुरिझम, उत्तर प्रदेश टुरिझम, ओडिसाचे बांबू मिशन, केन्दीय खादी ग्रामोद्योग, हस्तकला विभाग, केंद्र व राज्य शासनाचे कृषी विभाग, अग्रो टुरिझम, पॉवर एंड एनर्जी आदी विभागांचे स्टॉल असणार आहेत. केवळ महानगरानी होणारे हे प्रदर्शन पहिल्यांदाच ग्रामीण भागात होत आहे. नागरीक़ामध्ये जागृती व्हावी आणि आत्मनिर्भर भारतसाठी प्रेरणा मिळावी, हाच या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश असून महिला, विद्यार्थी, उदयोजक, नोकरदार, व्यापारी, जेष्ठ नागरिक या साऱ्यांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी असणार आहे.

२२,२३ आणि २४ डिसेंबर या कालावधीत वेळापुर येथील शिवशंभो मंगल कार्यालय येथे सकाळी दहा ते सायंकाळी पाच पर्यन्त सर्वांसाठी मोफत पाहता येणार आहे. तरी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनमोहन भास्कर आणि आणि आनन्द पाल यांनी केले आहे.



## कामती बुद्रुकमध्ये २५ वर्षानंतर सत्ता परिवर्तन

- प्रवीण भोसले गटाचे सरपंच पदासह दहा उमेदवार विजयी
- रामराव भोसले-पाटील यांना जिंकता आली केवळ एक जागा

सुराज्य/विरवडे

संपूर्ण मोहोळ तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या कामती ग्रामपंचायतीवर अनेक वर्षपासून सता असलेल्या रामराव भोसले पाटील यांच्या पॅनलचा धुवा उडवीत प्रवीण भोसले यांनी सरपंच पदासह १० जागा जिंकून ग्रामपंचायतीवर निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे.साताधारी गटाचे रामराव भोसले पाटील यांच्या गटाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले आहे,

मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागतील कामती बुद्रुक ग्रामपंचायत राजकीय दृष्ट्या महत्त्वाची समजली जाते रामराव भोसले पाटील व प्रवीण भोसले या दोन गटात ग्रामपंचायत निवडणुकीत अटीतटीचा सामना झाला,गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत प्रवीण भोसले हे केवळ सात मताने सरपंच पदापासून दूर राहिले होते. मात्र यंदा विजयाला घवसनी घालत ग्रामपंचायतीवर एक हाती सत्ता आणली आहे .

प्रवीण भोसले यांच्या गटचे विजयी उमेदवार सरपंच पदी अंजली प्रवीण भोसले १४३९, मते मिळाली आहेत तर सदस्य संजना यशवंत गायकवाड ४०१, सुरय्या मैनोदीन शेख ३८७, मारुती सुखदेव खराडे ३३४, मनोज दिंगबर गायकवाड ३४९, बालिका सुनील भोसले ३७३,संजयकुमार देविदास वाघमोडे २९३, करुणा सोमनाथ पवार२८९, आनंद काशिनाथ गायकवाड ४४०, सांगिता रमेश जाधव ४१७, करुणा राहुल वाघमारे ३७७ आदी विजयी झाले तर रामराव भोसले पाटील यांच्या गटचे दत्तात्रय मारुती भोसले ३८९ मतांनी विजयी झाले आहे,

हे उमेदवार विजयी करण्यासाठी प्रवीण भोसले, शिवसेना तालुका प्रमुख अशोक भोसले, बाळासाहेब डुबे पाटील, सादाभाऊ कोकरे, ॲड पावनकुमार गायकवाड, श्रीनिवास भोसले, दयानंद पाटील, युवराज भोसले, राजू भोसले, आबा भोसले, रघुनाथ खराडे, रामचन्द्र खराडे, मोहोन भोसले, अफसर मुजावर, हेमंत भोसले, मधुकर वाघमोडे,युवराज कारंडे आदींने परिश्रम घेतले

---

# किणी ते सुलतानपूर रस्त्यावरील बोरी नदीवरील पुलासाठी १३ कोटी रुपये मंजूर

## गेल्या २५ वर्षांची प्रलंबित मागणी पूर्ण : आ.सचिन कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

किणी पंचक्रोशीतील नागरिकांसाठी महत्त्वाचा दुवा ठरणारा तसेच शेती आणि दळण वळण या दोन्हीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या बोरी नदीवरील पुलाच्या बांधकामासाठी पुरवणी अर्थसंकल्पात १३ कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. किणी ते सुलतानपूर रस्त्यावरील किणी गावापासून दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बोरी नदीवरील पुलाची अतिशय आवश्यकता या भागातील नागरिकासाठी होती. किणी परिसरातील बहुतांश शेती ही बोरी नदीच्या पलीकडे सुलतानपूर शिवारात आहे.

पावसाळ्यात सहा महिने बोरी नदीला पाणी असल्याने पलीकडचे आपल्या शेतीला जाण्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागत असे. दीड किलोमीटरच्या अंतर पार करून जाण्यासाठी त्यांना पर्यायी पूल नसल्याने किणी परिसरातील नागरिकांना सुलतानपूर शिवारातील शेतीत जाण्यासाठी चुंगी ते हन्नूर ते सुलतानपूर असा १६ ज्ञा चा प्रवास त्यांना करावा लागत असे. त्यामुळे प्रत्येकाला एका फेरीला ३२ किलोमीटर आंतर ज्यादा जावे लागत होते.याशिवाय किणीहुन शेतीसाठी बोरीनदीपलीकडे मंजूर घेऊन जाणे खूप त्रासदायक ठरत होते.



यासाठी किणी परिसरातील नागरिक या बोरी नदीवरील पुलाचे बांधकाम होऊन मिळण्याबाबत प्रतीक्षेत होते. अक्कलकोटच्या उत्तर भागातील सर्वात महत्त्वाचा हा पूल आहे. या भागातील नागरिकांनी गेल्या पंचवीस वर्षांपर्यंत प्रलंबित प्रश्न न सुटल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता आणि हे सदर पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. याला त्वरित प्रतिसाद देत कल्याणशेट्टी यांनी शासन स्तरावर निधी मिळवण्यासाठी सतत पाठपुरावा केला या मागणीला अखेर यश आले असून पुरवणी अर्थसंकल्पात सदर पुलाच्या बांधकामासाठी १३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. या पुलाच्या बांधकामाचे पूर्ततेने किणी परिसरातील नागरिकांना सोलापूरला जाण्यासाठी किणी सुलतानपूर ते नीलेगाव ते ईटकळ मार्गे सोलापूर किंवा किंवा सुलतानपूर ते हन्नूर मार्गे सोलापूर असा दुहेरी दळणवळणाच्या दृष्टीने सोयींचा रस्ता तयार होऊन मिळणार आहे. याशिवाय सदर रस्ता या पुलाच्या पूर्ततेनंतर नळदुर्ग किंवा तुळजापूर या दोन्ही शहरांच्या माध्यमातून मराठवाड्यामध्ये जाणे अतिशय सुकर होणार आहे. सदर पुलाच्या बांधकामासाठी पुरवणी अर्थसंकल्पात १३ कोटी मंजूर झाल्याने किनी पंचक्रोशीतील नागरिकांना खूप मोठा दिलासा मिळून त्यांचे शेती आणि इतर दळवणाच्या सुविधेत भर पडून त्यांना खूप मोठी मदत होणार आहे . सदर निधीच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले या निधी मंजुरीसाठी अक्कलकोटच्या किणी पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने त्यांचे विशेष आभार व्यक्त करत असल्याचे कल्याण शेट्टी यांनी सांगितले.

### काजूकतली फुकट दिली नाही

# पुण्याच्या स्वीट मार्टमध्ये गोळीबार

✔ सुराज्य/पुणे

**पुण्यात गुन्हेगारीचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. बलात्कार, हत्या अशा प्रकारच्या घटना नेहमी घडत असातात. असाच काहीशी धक्कादायक घटना पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक येथे घडली आहे. काजूकतली फुकट दिली नाही म्हणून स्वीट मॉलमध्ये गोळीबार केला असल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. ही धक्कादायक घटना सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक येथे घडली आहे. या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी एका अल्पवयीन मुलासह एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून दोन गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले आहेत.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड रस्ता परिसरातील वडगाव बुद्रुक येथे मुख्य रस्त्यालगत फुलपरी स्वीट मॉल आहे. सोमवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास या दुकानात दोन तरूण आले त्यांनी एक किलो काजूकतली घेतली. मात्र, दुकानदाराने पैसे मागितल्यावर त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर त्या तरुणांनी त्या दुकानदारावर गावठी पिस्तूल रोखून गोळी मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोळी बाहेर आली नाही. त्यानंतर त्या तरुणांनी पुन्हा पिस्तूल नीट तपासून गोळी झाडली. मात्र, गोळी दुकानातच पडली. या सर्व गोंधळात त्या ठिकाणी गर्दी जमल्याचे पाहून आरोपींनी धूम ठोकली.

घटनेनंतर दुकानदारांची खेळण्यातील बंदूक समजून त्या घटनेकडे दुर्लक्ष केले. मात्र, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सचिन निवंगुने यांना हा प्रकार समजल्यावर त्यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शैलेश संखे यांना झालेला प्रकार सांगितला. पोलिसांनी घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच दुकानात बंदुकीतून पडलेली गोळी ताब्यात घेऊन तपासली असता, ती खरी असल्याचे लक्षात आले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी लागलीच आरोपींचा शोध घेतला.

या प्रकरणी एका अल्पवयीन मुलासह एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून दोन गावठी पिस्तूल जप्त केले आहेत. भर रस्त्यालगत घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

# पुण्यात कोयता गँगचा धुमाकूळ

### अजित पवार विधानसभेत गरजले, काय तो बंदोबस्त करा

✔ सुराज्य/पुणे

राज्यातल्या अनेक शहरातील नागरिक कोयता गँगच्या दहशतीखाली जगत आहेत. कोयता गँगचे वाढते लोण रोखण्यासाठी, राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कठोर कारवाई करावी, त्यासाठी या गँगच्या गुन्हेगारांना मकोका लावा, तडीपार करा, अशी मागणी विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी थेट हिवाळी अधिवेशनात केली आहे.

पुण्यातील हडपसर पोलिसांनी हद्दीमध्ये कोणतीही 'कोयता गँग' अस्तित्वात नसल्याचे म्हटले असले तरी, 'हडपसर भागातील वाढती गुन्हेगारी व मांजरी परिसरातील नागरिकांमध्ये असलेल्या 'कोयता गँग'च्या दहशतीमुळे या गँगवर 'मकोका' लावावा, आरोपींना तडीपार करावे. तसेच 'कोयता गँग'ची दहशत मोडून काढण्यासाठी कठोर कारवाई करा, अशी मागणी अजित पवार यांनी थेट हिवाळी अधिवेशनात केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून मांजरी परिसरात 'कोयता गँग'ची मोठी दहशत पसरली आहे. १५ दिवसांपूर्वी मांजरी परिसरातील नागरिकांनी हडपसर पोलीस ठाण्यावर मोर्चा नेऊन 'कोयता गँग'च्या दहशतीबाबत कारवाई करण्याची मागणी केली होती. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

या बातमीची दखल घेऊन राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हडपसर परिसरातील वाढती गुन्हेगारी व 'कोयता गँग'च्या दहशतीबाबत हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून सरकारचे याकडे लक्ष वेधले.

# दादांची अडचण, फडणवीस सावरायला उठले, पण अजितदादांनी निकाल लावला

✔ सुराज्य/नागपूर



मागील काही दिवसांपासून महापुरुषांबद्दल केलेल्या वक्तव्यावरून राज्यातील वातावरण चांगलेच तापले होते. त्यात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापुरुषांबाबत बोलताना वादग्रस्त विधान केले होते. त्यातच चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरेंना प्रबोधन ठाकरेंचं माझी जीवनगाथा' हे पुस्तक भेट म्हणून दिले. 'आमच्याबरोबर भीक मागायला कोण येणार?' असा उल्लेख या पुस्तकात केला असल्याचे ते म्हणाले. यावरुन राष्ट्रवादी नेते छगन भुजबळ यांनी विधानसभेत बोलताना निशाणा साधला.

शाळा काढल्यानंतर खर्च भागवायचा असेल तर निधी लागेल, असे यावेळी भुजबळ म्हणाले.त्यासाठी भीक मागून निधी मागितला तर परवानगी आहे का? असा सवाल त्यांनी यावेळी केला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी पुस्तकातील संदर्भ देऊन भीक मागण्याचे उल्लेख वाचून दाखविले.

या राज्यात त्यासाठी कुणालाही भीक मागण्याची वेळ येणार नाही, असे यावेळी फडणवीस म्हणाले.

## विद्यार्थ्यांकडून 'सीओईपी'ला ८.२५ कोटींची देणगी


✔ **सुराज्य/पुणे** : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (सीओईपी) तंत्रज्ञान विद्यापीठातील गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सीओईपीचे माजी विद्यार्थी आशिष अचलेरकर यांनी ८.२५ कोटींची देणगी दिली आहे. या निधीतून दरवर्षी १०० ते १५० गरजू विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च करण्यात येणार असून, सीओईपीला आजवर मिळालेल्या देणग्यांतील ही सर्वांत मोठी देणगी ठरली आहे.

# नाशिकमध्ये थरकाप उडवणारी घटना; दोन तरुणांचा मृत्यू

✔ सुराज्य/नाशिक

**उत्तर प्रदेशात हॉटेलमध्ये गॅस गळतीनंतर लागलेल्या आगीत होरपळून नाशिकमधील दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यातील एका तरुणाचा घटनेच्या दिवशीच तर दुसऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. प्रकाश सुधाकर दाते (३०) आणि बादशाह परवेज शेख (२६) अशी मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत. हे दोन्ही तरुण त्यांच्या मित्राच्या लग्नासाठी उत्तर प्रदेशात गेले होते.**

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सातपूर येथे असलेल्या एका हॉटेल संचालकाच्या मुलाचे लग्न उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथे होते. या लग्नासाठी सातपूरमधील ७ युवक एका वाहनाने गेले होते. ८ डिसेंबर रोजी लग्नसोहळा आटोपल्यानंतर ते फिरण्यासाठी आणि दर्शनासाठी लखनौ येथे गेले. दरम्यान त्यांनी तेथे हॉटेलमध्ये रूम बुक केली आणि तिथेच मुक्काम करण्याचे ठरवले. मात्र, रात्रीच्या वेळी हॉटेलच्या खाली असलेल्या बिर्याणी कॉर्नर येथे प्रकाश व बादशाह हे दोघे मित्र बिर्याणी खाण्यासाठी गेले होते. यावेळी दुर्दैवाने बिर्याणी हॉटेलमध्ये गॅस गळतीने भीषण आग लागली.



या आगीत प्रकाश दाते हा १०० टक्के भाजला गेल्याने त्याचा त्या दिवशीच मृत्यू झाला, तर बादशाह शेख हा ७० टक्के भाजल्याने त्याच्यावर लखनऊ येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. जखमी बादशाहाच्या कुटुंबियांनी तात्काळ लखनौकडे धाव घेऊन मुलाला वाचवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, रविवारी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आणि कुटुंबियांनी रुग्णालयातच हंबरडा फोडला.

## दहशत पसरण्यासाठी उमेश कोल्हेंची हत्या

✔ सुराज्य/अमरावती : येथील व्यावसायिक उमेश कोल्हे यांच्या हत्या प्रकरणात तबलिगी जमात या संघटनेतील कट्टरवादी सदस्य सामील होते, असा दावा राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) मुंबई येथील न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रात केला.

लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी हे षड्यंत्र रचण्यात आल्याचे एनआयएने म्हटले आहे. आरोपपत्रात तपास संस्थेने १७० हून जास्त साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. अमरावतीत २१ जून २०२२ रोजी रात्री उमेश कोल्हे यांची रस्त्यावर गळा चिरून हत्या करण्यात आली.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना मिळणार नोकरी

✔ सुराज्य/नागपूर : काँग्रेस आमदार भाई जगताप यांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा मुद्दा आज विधान परिषदेत उपस्थित केला. गेल्या अनेक वर्षांपासून सफाई कामगारांच्या वारसा हक्कांना नियुक्तीवरून वाद सुरू आहे. म्हणून याबाबत प्रश्नोत्तराच्या सत्रात प्रश्न विचारण्यात आला.

नागूपर-महाराष्ट्र राज्याच्या सफाई कर्मचाऱ्यांना, पाल्यांना वारसाहक्काने नोकरी आणि सोयी-सुविधा देण्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विविध संघटनांनी निवेदन दिले आहे. यावरून मंत्रिमंडळ बैठकीत उपसमिती नेमण्यात आली असून या समितीच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यानुसार, लाड-पागे समितीच्या शिफारशीवरून सफाई कर्मचाऱ्यांच्या वारशांना नियुक्ती देण्याबाबत कॅबिनेटसमोर चर्चा झाली आहे. याचा प्रस्ताव लवकरच जाहीर होईल, अशी माहिती संजय राठोड यांनी विधान परिषदेत दिली. सफाई कर्मचाऱ्यांच्या वारशांच्या नियुक्तीवर बैठक झाली आहे, इतिवृत्त झालेले आहे आता शासन निर्णय येऊन सर्व घटकातील लोकांसाठी निर्णय घेण्यात येईल, असे संजय राठोड म्हणाले.

# मेटे यांचे गड कार्यकर्त्यांनी राखले

### तब्बल ३२ ग्रामपंचायतीवर शिवसंग्रामचा झेंडा

✔ सुराज्य/बीड

शिवसंग्राम पक्षाचे नेते विनायकराव मेटे यांचे मराठा आरक्षणाच्या बैठकीसाठी मुंबईकडे येत असताना पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर अपघाती निधन झाले होते. विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर ही पहिलीच ग्रामपंचायत निवडणूक झाली. शिवसंग्रामने ही ग्रामपंचायत निवडणूक रामहरी मेटे म्हणजेच विनायकराव मेटे यांचे लहान बंधू यांच्या नेतृत्वात लढवली होती. आपला नेता आपल्यामध्ये नसला तरी आपण आपल्या नेत्याच्या पक्षाला उंच करायचे अशी भावना व्यक्त करत कार्यकर्त्यांनी तयारी केली.

या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये धडाडीने काम करत तब्बल ३२ ग्रामपंचायतीवर शिवसंग्रामने वर्चस्व मिळवले आहे.

विनायकराव मेटे यांच्यानंतर शिवसंग्रामला खंबीर नेतृत्व असं कोणीही नव्हते. विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर पहिलीच ग्रामपंचायत लढवण्यासाठी विनायकराव मेटे यांचे लहाने बंधू रामहरी मेटे यांनी वज्रमुठ बांधली आणि विनायकराव मेटे यांच्या विचाराने ग्रामपंचायतीची निवडणूक लढवण्याचा ठरवले यामध्ये अनेक कार्यकर्ते आपल्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने कामाला लागले आणि ३२ ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व आणल्याचे रामहरी मेटे यांनी बोलताना सांगितले आहे.

## दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात ३० टक्क्यांनी वाढ

✔ सुराज्य/पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ) आर्थिक तोट्यात आहे. उत्पन्नाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात खर्च वाढल्याने मंडळाला ४० ते ५० कोटींचा फटका बसत असून, आर्थिक नुकसानावर नियंत्रणासाठी दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क ३० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला देण्यात आला आहे.

# इस्रोचा आता माफियांना दणका

### एनसीबीच्या कारवाईत तिसऱ्या डोळ्याची मोलाची भूमिका

✔ सुराज्य/अहमदाबाद

इस्रो आणि नासाचे उपग्रह अवकाशातील घटनांचा, इतर ग्रहांचा अभ्यास करतात. आकाशात सोडण्यात आलेले उपग्रह वातावरणातील बदलांच्या अभ्यासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

पावसाचा अंदाज, नैसर्गिक आपत्तीबद्दल धोक्याचा इशारा देण्याचे काम उपग्रहांकडून केले जाते. याचा मोठा उपयोग आपत्ती व्यवस्थापनात होतो. मात्र, आता इस्रोच्या उपग्रहाचा वापर पहिल्यांदाच वेगळ्याच कामासाठी झाला आहे. गुजरातमधील कुख्यात ड्रग माफिया इसा रावने चार वर्षांत जमवलेल्या संपत्तीची माहिती एनसीबीने गोळा




केली आहे. विशेष म्हणजे ही माहिती उपग्रहाच्या माध्यमातून मिळवण्यात आली आहे.

देवभूमी द्वारकेसह मोरबीमध्ये माफिया इसा रावची संपत्ती असल्याचे उपग्रहातून मिळालेल्या माहितीवरून स्पष्ट झालं आहे. ड्रग व्यापारात राव पाकिस्तानची मदत घ्यायचा. एनसीबीच्या तपासातून दाऊद इब्राहिम गँगशी असलेले संबंधदेखील उजेडात आले आहेत. गुजरात एटीएसने १५ नोव्हेंबरला मोरबीतील एका प्रॉपर्टीवर धाड टाकली आणि १२० किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याचे बाजारमूल्य ६०० कोटी रुपयांच्या घरात होते. १८ नोव्हेंबर २०२१ रोजी गुजरात एटीएसने जमकल्याणपूरच्या नवद्रा येथून २४ किलो अंमली पदार्थ जप्त केले. त्याची किंमत १२० कोटी रुपये होती. त्यावेळी एटीएसने तिघांना अटक केली. आरोपींची चौकशी करण्यात आली. डिसेंबरमध्ये या प्रकरणाचा तपास एनसीबीकडे देण्यात आला.

## फोन टॅपिंग प्रकरणात रश्मी शुक्ला यांच्या अडचणीत वाढ

✔ सुराज्य/पुणे

फोन टॅपिंग प्रकरणात रश्मी शुक्ला यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण पुणे पोलिसांचा क्लोजर रिपोर्ट पुणे न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

राजकीय नेत्यांच्या फोन टॅपिंग प्रकरणात राज्यात झालेल्या सत्तांतरानंतर



आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना क्लिनचिट मिळाली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी न्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. पण न्यायालयाने क्लोजर रिपोर्ट फेटाळल्याने शुक्ला यांच्या अडचणीत वाढ होऊ शकते.

२०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राने ऐतिहासिक असे राजकीय नाट्य अनुभवले होते. शिवसेनेने भाजपला धक्का देत काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोबत घेऊन महाविकास आघाडीची स्थापना केली होती.

## लसीकरण करून घ्या अन् मास्कही वापरा

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : चीनसह इतर काही देशांमध्ये कोविड-१९ संसर्ग झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, दर आठवड्याला कोविड परिस्थितीबाबत आढावा बैठक घेण्याचा केंद्र सरकारने घेतला आहे. याशिवाय, ज्यांचे लसीकरण अद्याप बाकी आहे, त्यांनी ते करून घ्यावे आणि गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करावा, असे आवाहनही केंद्र सरकारने केले आहे.

# 'ते' नागपूरचे प्रकरण नेमके काय?

✔ सुराज्य/मुंबई

**नागपूर सुधार प्रन्यासच्या हरपूर येथील जमिनीचा वाद हा आता राज्यस्तरीय मुद्दा झाला आहे. ज्या मुद्द्यावरून विरोधक मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, त्याची सुरुवात २००४ साली झाली आहे. तेंव्हापासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका प्रलंबित असून वेळोवेळी त्यात विविध आदेश पारित झाले आहेत. ज्या प्रकरणावरुन मुख्यमंत्री अडचणीत, ते नागपूरचे प्रकरण नेमके काय?**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नगरविकास मंत्री असताना गरिबांसाठी घरं देण्याच्या उद्देशाने संपादित केलेल्या भूखंडाबाबत धक्कादायक बाब उघड झाली आहे. नागपुरात १०० कोटींपेक्षा अधिक किमतीचा भूखंड अतिशय कमी रुपयांत जवळपास दोन कोटी रुपयांत बिल्डरला दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिंदेंनी हा भूखंड १६ जणांना दोन कोटींना दिल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. नागपूर सुधार प्रन्यासच्या हरपूर येथील जमिनीचा वाद हा आता राज्यस्तरीय मुद्दा झाला आहे. ज्या मुद्द्यावरून विरोधक मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, त्याची सुरुवात २००४ साली झाली आहे. तेव्हापासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका प्रलंबित असून वेळोवेळी त्यात विविध आदेश पारित झाले आहेत.

**नागपूर हरपूर जमीन**

नागपूर मौजा हरपूर येथील ही जमीन असून या प्रकरणात आम्ही आवाज उठवू, असेही आव्हाड म्हणाले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नगरविकास मंत्री असताना त्यांनी अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोपही विरोधकांकडून केला जात आहे. १९८० पासून ही जमीन झोपडपट्टी योजनेसाठी अधिकृत आहे. परंतु याचा झोपडपट्टी आवाज योजनेसाठी वापर होत नसल्याचा आरोप २००४ मध्ये झाल्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले.

**८५ जमीन प्रकरणांमध्ये अनियमितता**

शहरातील एकूण ८५ जमीन प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याने न्यायालयाला या मुद्द्याची गांभीर्याने दखल घ्यावी लागली. या ८५ प्रकरणांपैकी एक प्रकरण हरपूर परिसरातील १९,३३१,२४ चौरस मीटर जमिनीचे आहे. ही जागा झोपडपट्टी पुनर्वसनाच्या उद्देशाने आरक्षित करण्यात आली आहे. यातील एकूण ४९ पैकी २३ भूखंड नियमित झाले आहेत. उर्वरित १६ भूखंडांच्या नियमितीकरणासाठीचा हा सारा खटाटोप आहे. त्यासाठी नासुप्र आणि नगरविकास खात्याकडे अर्ज करण्यात आले होते.

**जमीन प्रकरणाची पार्श्वभूमी**

शहरातील ८५ विविध लेआऊट आणि भूखंडांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झाली. या जमिनी अविकसित होत्या. मात्र, त्या आरक्षित होत्या. अनिल वडपल्लीवार यांनी या प्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने याचिका दाखल करुन ड. आनंद परचुरे यांची या प्रकरणी न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली.

**महाविकास आघाडी सरकारमध्ये नगरविकास मंत्री**

२०१८ मध्ये गिलानी समितीचा अहवाल न्यायालयापुढे सादर करण्यात आला. असे नियमितीकरण केल्यास शहरातील आरक्षित भूखंडसुद्धा हातून जातील, त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असेपर्यंत कोणत्याही आरक्षित जमिनीचे नियमितीकरण केले जाऊ नये, अशी शिफारस या समितीने आपल्या अहवालात केली.

२० एप्रिल, २०२१ रोजी नगरविकास खात्याने या जमिनींच्या नियमिततेचा निर्णय घेतला. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये नगरविकास मंत्री होते.

# महिला कर्मचाऱ्याची पाठ थोपटली


### बॉसला भरावा लागला १ कोटींचा दंड

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**कर्मचारी आणि बॉस यांच्यात होणारी भांडण आणि त्यानंतर त्यांना भरावा लागणारा दंड याबाबत तर तुम्ही ऐकले असेलच. अनेकदा, बॉस आणि कर्मचाऱ्यांचे भांडण इतके टोकाला जाते की दोघांपैकी एकाला नोकरीवर पाणी सोडावे लागते. मात्र, आता एका क्षुल्लक कारणामुळे बॉसला चक्क एक कोटींचा दंड भरावा लागला आहे.**

एका महिला कर्मचाऱ्याने तिच्या बॉसवर केलेल्या आरोपांमुळे त्यांना तब्बल एक कोटींचा दंड भरावा लागला आहे. आयर्रलँडमधील ही घटना असून सोशल मीडियावर सध्या चर्चेत आहे. मीडिया रिपोर्टनुसार एका खासगी कंपनीतील ही घटना आहे.

कार्यालयीन कामाच्या वेळेत बॉसने एक महिला कर्मचाऱ्याची पाठ थोपटली.



मात्र, महिला कर्मचाऱ्याला बॉसचे हे वर्तन आवडले नाही आणि ती नाराज झाली. त्यानंतर ती तिथून निघून गेली व तिच्या नेहमीच्या जागेवर येऊन बसली. महिलेने हा किस्सा तिच्या सहकाऱ्यांनाही सांगितला. सहकाऱ्यांना कळताच एकच खळबळ उडाली आहे.

समितीने चौकशी केल्यानंतर एक अहवाल सादर केला. या अहवालात हा लाजिरवाणा व मानसिक त्रास देणाचा हेतूपुरस्पर केलेला प्रकार असल्याचा ठपका ठेवला आहे. समितीच्या या अहवालानंतर त्या महिलेला नुकसानभरपाई म्हणून १ कोटी देण्याची सूचना केली. या सूचनेनुसार महिलेला १ कोटी रुपये देण्यात आले.

# महापुरुषांच्या अवमानाच्या निषेधार्थ भीमसैनिकांचा मोर्चा

सुराज्य/सोलापूर

**महापुरुषांविरोधात अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांना ५ वर्ष शिक्षेचा कडक कायदा विधिमंडळात करावा व राज्यपाल आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना पदावरून हटविण्यात यावे यासह अन्य मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोलापुरात बुधवारी भीमसैनिकांनी भव्य मोर्चाद्वारे येऊन जोरदार निदर्शने केली.**





महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महामंडळ व शहर जिल्ह्यातील तमाम भीमसैनिकांच्या वतीने बुधवारी सोलापुरात पार्क चौक येथे विराट मोर्चा व निदर्शने आंदोलन करण्यात आले. शहरातील विविध भागातून भीमसैनिकांसह महिला मोठ्या संख्येने मोर्चाद्वारे या निदर्शने आंदोलनात सहभागी झाले होते. हातात निळे झेंडे घेऊन निळी टोपी घालून कार्यकर्ते सहभागी झाले होते. मोठा निळा ध्वज सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. जय भीमच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबाबत अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांना ५ वर्ष शिक्षेचा कडक कायदा विधिमंडळात करावा व राज्यपाल आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना पदावरून हटविण्यात यावे, चंद्रकांत पाटील यांच्याविरुद्ध ट्रॉसिटी व फौजदारी गुन्हा दाखल करावा. शाई फेकणाऱ्या पिंपरी चिंचवड येथील कार्यकर्त्यांवरील गंभीर स्वरूपाचे गुन्हे त्वरित मागे घ्यावेत, घटनास्थळी कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील कारवाई मागे घेऊन त्यांना तत्काळ सेवेत घ्यावे. कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यास दबाव टाकणाऱ्या विरुद्ध ही कायदेशीर कारवाई बरोबरच देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. विविध पक्षांच्या नेत्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून या आंदोलनास पाठिंबा दर्शवला. यावेळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, नेते प्रमोद गायकवाड , माजी परिवहन समिती सभापती राजन जाधव , माजी उपमहापौर पद्माकर काळे, संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे, सोहन लोंढे, मतीन बागवान यांच्यासह विविध पक्ष संघटनांच्या नेत्यांनी पाठिंबा दर्शविला.

या आंदोलनात माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, महामंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे , सचिव केरू जाधव, माजी नगरसेवक गणेश पुजारी, दशरथ कसबे, शांतीकुमार नागटिळक, पिंटू ढावरे, रॉकी बंगाळे, अमोल गोडसे, अजित बनसोडे, आशुतोष नाटकर, विनोद वाघमारे, विकी शेंडगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## कोरोना-म्युकरमायकोसेस बद्दल सतर्कता बाळगा

### जिल्हा आरोग्य विभागाचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात कोरोना हा आजार कमी जरी झाला असे वाटत असल तरी त्याच्या जोडीला म्युकरमायकोसेस या नव्या सुरू झालेल्या आजाराचे जिल्ह्यात थैमान वाढत आहे. त्यांची आजची रुग्ण संख्या संख्या जवळपास ६१६ पर्यंत पोहोचल्याचे जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले असून त्या संदर्भात नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन करण्यात आले आहे

सध्या जिल्ह्यात ३५ आरोग्य केंद्रात उपचार सेवा दिली जात आहे. आज नव्याने आढळलेली रुग्ण संख्या शून्य इतकी आहे सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेली रुग्णांची संख्या शून्य आहे आजपर्यंत बरे झालेले रुग्ण संख्या ६०९ इतकी आहेत. आजपर्यंत या रोगाने मृत्यू पावलेले संख्या १०७ इतकी असून या आजार संदर्भात नागरिकांनी कोरोना आजारा इतकेच सतर्क राहण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. याबाबत आरोग्य विभागाकडून पत्र काढण्यात आले आहे.

## झारखंड सरकारचा निषेध; जैन समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

सुराज्य/सोलापूर

झारखंड सरकारच्या वतीने जैन धर्मियांचे अतिशय पवित्र असे सिद्धक्षेत्र महा पर्वतराज श्री सम्मेद शिखरजी हे पर्यटन क्षेत्र घोषित केले आहे. यांचा निषेध करण्यासाठी आणि घोषित केलेले पर्यटन क्षेत्र रद्द करण्याच्या मागणीसाठी सोलापूर समस्त जैन समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत निषेध केला.

जैन धर्मियांचे २४ तीर्थंकर भगवानपैकी २० तीर्थंकर भगवान ज्या पवित्र भूमीत मोक्षाला गेले अश्या झारखंड राज्यातील मधुबन जिल्हा - गिरडीह येथील महा पर्वतराज श्री सम्मेद शिखरजी क्षेत्र झारखंड सरकारने 'पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. यामुळे परिसरात नॉनव्हेज हॉटेल्स, पब बार व तसेच इतर अशा बऱ्याच मनोरंजक गोष्टी सुरू होतील की ज्या जैन समाजाच्या अहिंसा तत्वाच्या एकदम विरुद्ध आहेत. यांच्या निषेध राज्यभर केला जात आहे. यांचा एक भाग म्हणून सोलापूर शहरात सर्व जैन समाज आणि जैन संघटनांनी एकत्र येत शुक्रवार पेठेतील महावीर भवन येथून भव्य मोर्चा काढला.

शुक्रवार पेठ येथून निघालेला मोर्चा जुनी फौजदार चावडी, दत्त चौक मार्ग जिल्हाधिकारी कार्यालावर आल्यानंतर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी झारखड सरकारचा निषेध करत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेद देण्यात ओले. झारखंड सरकारच्या निर्णयामुळे जैन समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पवित्रभूमीचे पावित्र्य धोक्यात आले आहे. जैन समाजाच्या अस्मितेवर घाला घालायचा हा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे देशभरातील सकल जैन समाजामध्ये संतापाची लाट उसळली असून देशभरात सर्व घरातून या निर्णयाचा निषेध केला जात असल्याच्या भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केल्या.



यामोर्चात शहर व जिल्ह्यातील विविध सकल जैन मंदिर ट्रस्ट, संघटना, युवक व महिला मंडळ, शैक्षणिक संस्था, सकल जैन समाज गांधी नाथा रंगजी, श्राविका संस्था, वालचंद शिक्षण समूह, सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ, आदिनाथ मंदीर ट्रस्ट, पंचम समाज, कासार समाज, शेतवाल समाज स्थानक वासी श्वेतांबर सघ, मूर्ती पूजक श्वेतांबर संघ अनेक संस्था सहभागी झाल्या होत्या. भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेठी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल जमगे, जैन श्वेतांबर सोसायटीचे मधूबन शिखर, सकल जैन समाजाचे मार्गदर्शक अरविंद दोशी, सुकुमार चंकेश्वरा संजय गांधी हर्षल कोठरी, इदरमल जैन , गौतम वेद, प्रकाश संकलेचा, कल्पेश मालू, पदम राका, केतन शहा, संजय सेठीया, कनुभाई शहा, पराग शहा, जिंतेद्र बलदोटा, मनीष कोठारी, सुभाष लुनावत, गौतम छाजेड, देवेंद्र शेटगार, रविंद्र कटके, चारुकीर्ती शिरसोडे, पं महावीर शास्त्री, सुनिल गांधी, सागर शहा, राजेद्र कासवा, जितेद्र आकराणी, मिहीर गांधी, राहुल शहा, अमित जैन, शाम पाटील, वालचंद पाटील, धनंजय शहा कमला कासवा, सरीता कोठडीया, कामीनी गांधी यांची उपस्थित होते.

## मंगळवेढ्यात इसमाची आत्महत्या

सुराज्य/मंगळवेढा

मंगळवेढा शहरातील एका ५० वर्षीय इसमाने घराच्याजवळ असलेल्या आंब्याच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दरम्यान पोलिसांनी अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे.

अंकुश कृष्णा उन्हाळे असे गळफास घेणाऱ्या इसमाचे नाव आहे. अंकुश उन्हाळे (वय ५०) याने दि.२१ रोजी २.०० वा. डांगे गल्लीतील राहते घराच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या झाडाला अज्ञात कारणावरून दोरीने झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. याची खबर जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे मैलकोली अशोक उन्हाळे यांनी दिली आहे. तपास पोलिस करीत आहेत.

## महापालिकेतील भोंग्याचा आवाज झाला बंद

सुराज्य/सोलापूर



स्वातंत्र्य पूर्वकाळापासून सोलापूर हे गिरणगाव म्हणून जगप्रसिद्ध होते. सूत व कापड गिरण्यांच्या त्या भोंग्याचा आवाज स्मार्ट महापालिकेने आतापर्यंत जपला होता. मात्र आता या भोंग्याचा आवाज बंद करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

सोलापूर शहरात पूर्वी लक्ष्मी-विष्णू, नरसिंग गिरजी, जाम श्री, सोलापूर सूत मिल, यशवंत, शारदा यासहअनेक छोट्या-मोठ्या सूत गिरण्या होत्या. सोलापूरला गिरणगाव' अशी नवी ओळख मिळाली. या गिरण्यांमध्ये हजारो कामगार कार्यरत होते.

त्यावेळी गिरणी सुरू झाल्यावर भोंगा सुरू होत होता. सर्व पाळ्यांमध्ये चालणाऱ्या गिरणीमध्ये नियमितपणे वाजणाऱ्या भोंग्यावर सारे शहर तेव्हा सतर्क आणि जागे व्हायचे. मात्र कालांतराने विविध कारणाने गिरण्यांनी मान टाकली असली तरी त्या कापड गिरण्यांच्या भोंग्याचा आवाज मात्र स्मार्ट सोलापूर पालिकेने आतापर्यंत जपला होता. सकाळी पावणे दहा वाजता, जेवण सुट्टीसाठी दुपारी दीड वाजता, पुन्हा २ वाजता आणि संध्याकाळी सव्वा सहा वाजता शेवटचा भोंगा वाजत होता. त्यावरच पालिका कर्मचारी कार्यरत होते. मध्यंतरी आ. प्रणिती शिंदे या सायंकाळी महापालिकेत एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या, त्यावेळी भोंगा वाजला होता. तेव्हा आ. शिंदे यांनीही गिरणगावाची आठवण झाली असा उल्लेख भाषणात केला होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून हा भोंगा मात्र महापालिका प्रशासनाने बंद केला आहे.

## मृत्यूस कारणीभूत; ऑटोरिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा

सोलापूर : पायी चालत जात असताना अज्ञात एका ऑटोरिक्षा चालकाने भरधाव वेगात व निष्काळजीपणाने वाहन चालवून एकास धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ऑटो रिक्षा चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.१७ डिसेंबर रोजी सकाळी मल्लिकार्जुन नगर येथे घडली. याप्रकरणी वंदना दत्तात्रय परकीपल्ली (वय-४७,रा.जुना शिवसेना घरकुल, कुंभारी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात ऑटोरिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे पती दत्तात्रय परकीपल्ली (वय-५५) हे मल्लिकार्जुन नगर अक्कलकोट रोड येथील टेलर दुकानात काम करतात. रोजच्याप्रमाणे ते जेवणाचा डबा घेऊन घरातून कामाच्या ठिकाणी निघाले असता, अज्ञात ऑटो रिक्षा चालकाने भरधाव वेगात वाहन चालून त्यांना धडक देऊन गंभीरित्या जखमी करून मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.

## उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू; डॉक्टरविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

निष्काळजीपणामुळे व अपुऱ्या सुविधांमुळे एका रुग्णाचा मृत्यू झाल्याप्रकरणी डॉक्टराविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पो.ह. प्रदीप वसंतराव कदम यांनी फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून डॉ. ए.ए.कुलकर्णी (राज्य कामगार विमा हॉस्पिटल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. १९ मे ते २२ मे २०१८ रोजी रुग्ण हेमंत सुभाष सावंत (वय-१५,रा. विजापूर नाका झोपडपट्टी नंबर २ ) याच्यावर उपचार केले. त्याची त्यावेळेस परिस्थिती पाहता त्याला त्वरित सर्व सुविधांनी सज्ज अशा रुग्णालयात स्थलांतर करणे गरजेचे होते.मात्र डॉ. कुलकर्णी यांनी तशी व्यवस्था न केल्यामुळे रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झेला, असे फिर्यादीत नमूद आहे.हा गुन्हा सदर बझार पोलीस ठाणे कडे वर्ग केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.




### किरकोळ कारणावरून हाणामारी; सहाजणांवर गुन्हा

किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.२० डिसेंबर रोजी विद्या नगर येथे घडली. या प्रकरणी शारदा देवींदास मन्सावाले (वय-३२,रा.विद्या नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन सिताराम दिल्लीवाले, विरसिंग दिल्लीवाले, रेखा बालाजीवाले, राजश्री विरसिंग दिल्लीवाले, तेजू दिल्लीवाले, ज्योती मन्सावाले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.ह.इनामदार हे करीत आहेत.

### एटीएममध्ये ९ डेबिट कार्डचा वापर दीड लाखांची फसवणूक

सोलापूर (प्रतिनिधी) हिताची पेमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या एटीएममध्ये पावर इंटरप्शन एरर निर्माण करून ९ डेबिट कार्डचा वापर करत १ लाख ३६ हजार पाचशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ११ ते १३ डिसेंबर दरम्यान जोडबसवण्णा चौक येथील एटीएम मधून आज्ञाताने रक्कम काढून घेतली. हिताची कंपनीचे जिल्हा पर्यवेक्षक किरण संजय लांडगे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.जोडबसवण्णा चौक परिसरात हिताची कंपनीचे एटीएम मशीन आहे.या मशीन मधून अज्ञाताने पावर इंटरप्शन एरर निर्माण केले.त्यादरम्यान नऊ डेबिट कार्डचा वापर करत नऊ वेळा व्यवहार करून एक लाख छत्तीस हजार पाचशे रुपये काढून कंपनीची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोसई बादोले हे करित आहे.

### चोरट्याने पळवली दुचाकी

चार पुतळा समोर पार्क करून ठेवलेली दुचाकी (एम.एच.१३.बीएम.८१९१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.१८ डिसेंबर रोजी रात्री घडली.याप्रकरणी जिलानी चाँद तांबोळी (वय-३८,रा.नई जिंदगी,शिवगंगा नगर भाग २) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.ना. कामूर्ती हे करीत आहेत.

## मोटारसायकल चोरी प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

सोलापूर : मोटारसायकल चोरून नेल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१२ मार्च रोजी मार्केट यार्ड येथील सिद्धेश्वर बँकेसमोर घडली.मच्छिंद्र भागवत जाडकर (रा.सिंदवाडा मोडनिंब,माढा), सचिन जालिंदर चव्हाण (रा.मोडनिंब, माढा) व दत्तात्रय रावसाहेब शेळके (रा. अरण, माढा) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. फिर्यादी लक्ष्मण नाईकवाडे (वय-४२, रा.दर्गनहळळी द.सोलापूर) मोटरसायकल क्र. एम.एच.१३. जे.६५१५ वरील संशयित आरोपी यांनी चोरून नेली आहे. आशयाची फिर्याद नाईकवाडे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे.


## वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानचा वधू-वर परिचय मेळावा

सोलापूर : वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने रविवार दि. २५ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता येथील हुतात्मा मंदिर येथे वीरशैव समाजातील जंगम समाजासह सर्व पोटजातीचा ८ वा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष ॲड.बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा मेळावा काशिज्ञान पीठाचे जगद्गुरु श्री.श्री.श्री. १००८ डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात व काशिज्ञान पीठाचे नुतन जगद्गुरु श्री. श्री. श्री १००८ ज्ञानसिंहसनाधिश्वर डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्याय शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतआशिर्वादाने व श्री.ष.ब्र. रेणुकशिवयोगी शिवाचार्य हिरेमठ (मंद्रुप), श्री.ष.ब्र. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी (नागणसुर), श्री.ष.ब्र. शिवपुत्र महास्वामीजी मठाधीश श्री श्रीश्री सद्गुरु बसवारुढ महास्वामीजी मठ ट्रस्ट, सोलापूर यांच्या मंगलशिर्वादाने हा मेळावा होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते होणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान चेअरमन राजशेखर शिवदारे हे भूषविणार आहेत.

## माजी खा. डॉ.प्रभाकर कोरे यांचा 'जीवन गौरव' पुरस्काराने होणार सन्मान

सुराज्य/सोलापूर

के.एल.ई. सोसायटीचे चेअरमन माजी खासदार डॉ. प्रभाकर कोरे यांच्या अमृत महोत्सवी निमित्त वीरशेव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने 'जीवन गौरव' पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भारतीय जनता पार्टी सोलापूर जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल व मंगेश चिवटे यांची मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षपदी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात येणार आहे.



या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आ. विजयकुमार देशमुख, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, सुधीर खरटमल, माजी महापौर महेश कोठे, डॉ. बसवराज कोल्लुर, शिवसेना शिंदे गट जिल्हा प्रमुख मनिष काळजे यांची उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यासाठी आतापर्यंत २०० वधु-वरांनी समक्ष व वॉट्सअप व्दारे नोंदणी केली आहे. ६०० वधु-वरांची नोंदणी होईलअशी अपेक्षा आहे. या वधु-वर परिचय मेळाव्यासाठी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व कर्नाटक व गुजरात या राज्यामधून शिक्षित व उच्चशिक्षित, उद्योजक, व्यापारी व शेतकरी कुटुंबातील वधु-वर उपस्थित राहणार आहेत असे स्वागताध्यक्ष एडवोकेट बसवराज सलगर व कार्याध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस सिद्धय्या स्वामी हिरेमठ, राजशेखर विजापुरे, प्रशांत धुम्मा, कैलास जेऊरे, गौरव जक्कापुरे, मंगेश स्वामी, कैलास मेंगाणे, सुनील शरणार्थी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## दुहेरी जलवाहिनीच्या कामात टक्केवारीचे राजकारण चालू

### हिवाळी अधिवेशनामध्ये आ.प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केली शंका

सुराज्य/सोलापूर

नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार प्रणिती शिंदे यांनी उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम बंद असल्याबाबत आवाज उठवला आहे. मागील पाच वर्षापासून या प्रकल्पाचे वारंवार टेंडर काढून टक्केवारीचे राजकारण चालू असल्याची शंका त्यांनी व्यक्त करत त्वरित हा प्रकल्प पूर्ण करणे गरजेचे आहे, असे म्हटले आहे.



आ. शिंदे म्हणाल्या, स्मार्ट सिटी कंपनीच्या माध्यमातून सोलापूर शहरातील विविध विकास कामे हाती घेण्यात आलेले आहेत. त्यातील प्रामुख्याने महत्त्वाचे काम सोलापूर ते उजनी दुहेरी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनचे आहे. परंतु मागील पाच वर्षापासून या प्रकल्पाचे वारंवार टेंडर काढून टक्केवारीचे राजकारण चालू असल्याची बाब समोर येत आहे. हा प्रकल्प सोलापूर शहराच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वाचा असल्या कारणाने त्याचे काम लवकर होणे क्रम प्राप्त आहे. पण तसे न होता यामध्ये वर्क ऑर्डर दिल्यानंतरही काम करणाऱ्या कंपनीस हेतू पुरस्कार पाईपलाईनचे काम थांबवण्याचे आदेश दिले आहेत. याकरिता कोणतेही वैद्य कारण प्रशासनाकडे नाही तसेच याकरिता कोणतीही न्यायालयीन स्थगिती नाही. ही बाब विचारात घेऊन संबंधित अधिकारी यांना पिण्याच्या पाईपलाईनचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे. स्मार्ट सिटी योजने अंतर्गत विकास कामे करण्याकरीता रस्ता खोदण्यात येतो, परंतु दुरुस्त करण्यात येत नाही. यामुळे शहरामध्ये रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.



झोपडपट्टी भागामध्ये सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम मागे घ्यावी, नवीन नळ कनेक्शन सामूहिक रित्या देण्याबाबत कोटेशन रकमेमध्ये हफ्ते पाडून द्यावेत, रेल्वेच्या जमिनीवर ज्या झोपडपट्टी आहेत त्यांना अधिकृत करण्याकरीता एक धोरणात्मक निर्णय घ्यावा, या भागातील नागरिकांना अतिक्रमण काढण्याची नोटीस दिली आहे.

शासनाने रहिवाशांचे पुनर्वसन आहे त्या जागेवर किंवा पर्यायी जागेवर करावे, अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीत ड्रेनेज लाईन खराब झाली आहे. त्याच्या दुरूस्तसाठी महापालिकेला खासबाब म्हणून निधी द्यावा, आदी मागण्याही आ. शिंदे यांनी केल्या.

### विमानतळासाठी राजकारण नको, बोरामणीसाठी प्रयत्न हवे

सोलापूर शहरातील ज्वलंत प्रश्न बोरामणी विमानतळाचा आहे. बोरामणी विमानतळाकरीता आपण राजकरण न करता सोलापूरामध्ये विमानतळ झाले पाहिजे, बोरामणी विमानतळ पूर्णपणे अधिकृतरित्या झालेले आहे. सगळे मिळून बोरामणी विमानतळाकरीता मा. ज्योतीरादित्या सिंधीया यांच्याकडे जावून लवकरात लवकर विमानतळ विकसित होऊन कार्यरत होण्याकरिता प्रयत्न करावे, असेही आ. शिंदे यांनी म्हटले आहे.